## प्रकरण २- भारतीय राष्ट्रवादाची पार्श्वभुमी

### अ) ब्रिटीशांच्या धोरणांचा प्रभाव:-

> *The new land systems (Zamindari and ryotwari) made mobile both land and the peasent, and left the way open for the growth in power of the money lender and the absentee landlord.*
>
> *- D. & A. Thorner.*

साम्राज्यवादी मनोवृत्तीच्या इंग्रजांनी भारतीय कृषी व्यवस्थेत व्यापक स्वरुपाचे बदल केले. नव्या टू-धारण पद्धती, मालकी हक्काच्या नव्या कल्पना, वहिवाटीतील बदल, राज्याकडून अधिकाधिक भू - राजस्वाची मागणी ह्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत व सामाजिक संबंधात घडून आलेल्या परिवर्तनामुळे कृषीक्षेत्र ढवळून निघाले आणि त्यात विकृत आधुनिकीकरण आले. काळातील भूमीकर पद्धती वैदिक काळापासूनच भारतात ग्राम स्वातंत्र्याची कल्पना इंग्रजपूर्व होती. ग्राम प्रशासनाचा शेवटचा पण अत्यंत महत्वाचा घटक होता. स्थानिय शासन आणि भूमी कर ह्यादृष्टीने एकक म्हणून ग्राम कार्य करीत असे. काही लोकांच्या मते भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या आधीच्या काळात म्हणजे मुगल काळात भूमीचे स्वामित्व कोणाकडेच नव्हते. भूमीशी संबंध असणाऱ्या सर्वच घटकांचा त्यावर अधिकार होता. भूमीस्वामीला करारानुसार ठरलेली रक्कम देत राहील तोपर्यंत शेतक-याला त्याच्याकडे असलेल्या जमिनीवर पिके घेता येत होती. पाटील किंवा ग्रामाचा प्रमुख, मामलतदाराच्या किंवा नबाबाच्या वतीने कर वसूल करीत असे. कराचे प्रमाण साधारणतः १/६ ते १/३ इतके होते. पाटील दंडाधिकारी म्हणूनही काम पहात असे. ग्रामाच्या अंतर्गत व्यवस्थेला अनुसरून घ्यावयाची पिके, विशेष प्रकारच्या जमिनीचे विशेष लोकांमधे वाटप, सिंचाई व्यवस्था, शेतकऱ्यांपासून वैयक्तिक कर वसूली इ. गोष्टी ग्रामपंचायतीच्या सहाय्याने व तेथील प्रथा, परंपरा लक्षात घेऊन पाटील पार पाडीत असे. इंग्रजांची भूमीकर व्यवस्था व प्रशासन इंग्रजांनी भारताच्या विजयाचा आर्थिक लाभांसाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. ब्रिटिशांच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधांनी कंपनीला आयातनिर्यातीवरील कर वाढविण्यास प्रतिबंध लावला. त्यामुळे कंपनीचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेतीवरील कर हे होते. म्हणूनच त्यावर जास्त भर देण्यात आला व जास्त लक्ष केंद्रीत करण्यात आले.

ईस्ट इंडिया कंपनीचे प्रारंभिचे ब्रिटीश शासक भारताला आपली एक विशाल जागीर समजत होते. म्हणूनच भारतातून जास्तीत जास्त पैसा उपटण्याच्या तत्वाला ते चिकटून राहिले. पण त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टीने पिकांना लागलेला खर्च आणि मजूरीच जेमतेम निघत होती. ग्रामीण जनतेकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले. भूमीकराचा लिलाव करून जास्तीत जास्त कर देणा-याला जमीन देण्यात येत असे. अशी व्यक्ती प्रती-उत्पादक बनत असे. बरीच जमीन पडीत राहू लागल्याने कृषी उत्पादन कमी झाले. देशात दुष्काळाची स्थिती निर्माण झाली. म्हणूनच भारत आणि इंग्लंड सरकारने भूमीकर पद्धतीवर गंभीरपणेविचार केला. त्यातून काही परिणाम दिसू लागले. केला. (मूळ इंग्रजी '*tenure*' हा शब्द लॅटिन भाषेतील '*teneo*' पासून आला आहे. त्याचा अर्थ 'धारण करणे' *(to hold)* असा आहे.) भू-धारण हया शब्दात संबंधित अटी येतात ज्या आधारावर जमीनदार किंवा नव्या भू-धारण पद्धती ब्रिटीश शासकांनी भारतात वेगवेगळ्या भू-धारण पद्धतीचा अवलंब केलेल्या शेतक-याला राज्याकडून जमीन मिळते तसेच शेतक-याला भूमीस्वामीकडून, ढोबळ मानाने इ जमीनदारी, महालवारी आणि रयतवारी ह्या तीन प्रकारच्या भू-धारण पद्धतींचा भारतात अवलंब * कायम जमीनदारी पद्धती बंगाल, बिहार, ओरिसा, बनारस विभाग, उत्तर कर्नाटक येथे लागू कर आली. भारतातील ब्रिटीश प्रदेशांपैकी जवळ जवळ १९% क्षेत्र त्यामुळे व्यापले गेले. महालवारी उत्तर प्रदेशाच्या बहुतांश भागात, मध्यभारत क्षेत्र, पंजाब येथे लागू झाली आणि त्यामुळे ३०% प्रभावित झाला. रयतवारी पद्धतीचा अवलंब मुंबई व मद्रास इलाख्यातील मोठा भूभाग, आसाम आणि ठिकाणी करण्यात आला व त्यात अंदाजे ब्रिटीश भारताचा ५१% भाग समाविष्ट झाला.

१. एरिक स्टोक्स (*Eric stokes)* याचे पुस्तक *'The English utilitarians and India OxFord, 1959,* व जी.डी.बिर्स (*G.R. Bearce)* ह्याचे पुस्तक *'British Attitudes T wards India, OxFord, 1961* हयात व्यक्त झालेले विचार की, 'समकालीन रिति-रिवाजांचा भारतावर प्रभाव पडला. आधुनिक संशोधनाला मान्य नाही. सध्या पावेलचे विश्लेषण की, "भू-धारण पद्धती स्थानिक परिस्थितीनुसार बदलत होती मान्य जाते. बेडन पावेलने आपले पुस्तक *'The Land Systems of India, OxFord, 1982* असे प्रतिपादन केले की, बंगालमधील मोठमोठी जमीनदारी पद्धती, मद्रास व मुंबईन शेतक-यांशी वैयक्तिक कर ठरविण्याची पद्धती आणि उत्तर प्रदेशात महालवारी पद्धती हह्याच लागू करण्यात आली कारण ती तेथेतेथे आधीपासूनच अस्तित्वात होती.

राष्ट्रीय विचारसरणीच्या लोकांनी व भारतातील मार्क्सवाद्यांनी हे सिद्ध केले आहे क इंग्रजांनी भारतात आपले हित समोर ठेवूनच या पद्धती लागू केल्या. (संदर्भ: *Morris Morris and others: Indian Economy in the Nineteenth Century" A Sympe sium, Delhi, 1969).*

**कायम जमीनदारी व्यवस्था**

*(The Permanent Zamindari Settlement)*

जमीनदारी व्यवस्था इंग्रजांची देणगी होती आणि त्यात अनेक आर्थिक उद्देश समाविष्ट होते. पद्धती जागीरदारी, मालगुजारी, बिस्वेदारी इ. वेगवेगळ्या नावांनी ओळखली जाते. हया पद्धतीत शासन हिस्सा कायम स्वरुपात निश्‍चित केलेला होता, इतर पद्धतींमधे १० वर्ष ते ४० वर्षानंतर भूमीकरात बदल केला जात होता.

जमीनदारी पद्धतीनुसार जमीनदाराला भूमीस्वामी मानल्या जात होते, तो जमीन विकू शकत होत गहाण ठेवू शकत होता तसेच दान करू शकत होता. मात्र भूमीकराबाबत जमीनदाराला जबाबदार धर जाई आणि त्याची वसूल न झाल्यास त्याची जमीन जप्त केली जाई. जमीनीवरील कराचे दर फार जास्त ठरविण्यात आले होते. उदाहरणासाठी बंगालमधे हा द ८९% होता आणि जमीनदाराजवळ फक्त ११% शिल्लक रहात होती. जॉन शोअरने भूमीकर वसूलीच आकडे पुढीलप्रमाणे दिले आहेत.

वरील आकड्यांवरून हे स्पष्ट दिसते की, कंपनीच्या दिवाणीच्या पहिल्याच वर्षात त्याआधीच्या व्यवस्थेत बदल : नवी भू-धारण पद्धती आणि भू-राजस्व धोरणपेक्षा ८०% जास्त भूमीकर गोळा झाला होता. त्याचबरोबर १७९०-९१ मधे झालेली वसूली कंपनीच्या देवाणीच्या पहिल्या वर्षाच्या वसूलीच्या जवळजवळ दुप्पट झाली होती.

ह्या कायम व्यवस्थेतील सर्वात मोठा दोष म्हणजे सरकारचा आकडा ठरलेला असला तरी शेतकऱ्यांपासून जी वसूली जमीनदार करीत तो आकडा निश्‍चित नव्हता. पुढे त्या दरात वाढ करण्यात जाली. कर न दिल्यास शेतकऱ्यांचा अतिशय छळ केला जाई. १८५९, १८६८ आणि १८८५ मधे संमत केलेल्या बंगाल दर अधिनियमांचा (*Bengal Rent Acts)* शेतकऱ्यांना थोडाफार फायदा झाला. काही इतिहासकारांचे असे मत आहे की, वरील अधिनियम ग्रामीण भागातील असंतोष कमी करण्यासाठी केले ले

**महालवारी पद्धती** (*The Mahalwari System)*

ह्या पद्धतीनुसार भूमीकर शेतकऱ्यापासून नाही संपूर्ण गावापासून (ग्राम) किंवा महालापासून तर जागीरचा एक भाग) ठरविल्याप्रमाणे घेतला जात होता. भूमीवर संपूर्ण ग्रामाचा एकत्रित अधिकार होता चाला हिस्सेदारांचा समूह (*Body of co-sharers)* असे म्हणत. वैयक्तिक जबाबदारी असली तरी नमीकराच्या बाबतीत ग्रामाची संयुक्त जबाबदारी होती. एखाद्या व्यक्तीने आपली भूमी सोडून दिली तर त्याचा सांभाळ ग्रामसमाज करीत असे. हा ग्राम समाज संयुक्त भूमीचा व इतर जमिनीचा स्वामी रहात होता.

**वायव्य प्रांत व अवधमधील भूमी कर व्यवस्था**

वायव्य प्रांत आणि अवध (दोन्ही मिळून आजचा उत्तर प्रदेश) वेगवेगळ्या वेळी इंग्रज वर्चस्वाखाली जाले. १८०१ मधे अवधच्या नबाबाने कंपनीला अलाहाबाद व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश दिला. द्वितीय इग्रज-मराठा युद्धानंतर कंपनीने गंगा व यमुना नद्यांमधील प्रदेश जिंकून घेतला. तिस-या इंग्रज-मराठा कुद्धानंतर (१८१७-१८) लॉर्ड हेस्टिंग्जने उत्तर भारतातील बऱ्याच भागांवर वर्चस्व प्रस्थापित केले. मिळालेल्या प्रदेशाचा (*Ceded districts or territories)* पहिला लेफ्टनंट गव्हर्नर

कंपनीला हन्दी वेलस्लीने जमीनदार व शेतकऱ्यांबरोबर सरळ भूमी कर निश्चित केला आणि ही मागणी पहिल्याच वर्षी नबाबांच्या मागणीपेक्षा २० लक्ष रु. ने जास्त होती. तीन वर्ष पूर्ण होताहोताच हा कर १० लक्ष रु. वार्षिक जसा वाढविण्यात आला. नबाबांच्या काळात उत्पन्न कमी झाले तर त्या प्रमाणात कराचीही मागणी कमी होत होती. पण कंपनीने ठरविलेली रक्कम इतकी कठोर स्वरुपाची होती की भारताच्या इतिहासात अशी नागणी कधीच झाली नव्हती.

१८२२ चे नियमन (*Regulations of 1822)* आयुक्त मंडळाचा (*Board of Commissioners)* सचिव होल्ट मॅकेन्जी (*Holt Meckenzie)* याने आपल्या १८१९ च्या अहवालात उत्तर भारतातील ग्राम समाजाच्या अस्तित्वावर भर दिला. त्याने अशी शिफारस केली की, भूमीचे सर्वेक्षण (*Survey)* करावे, भूमीवरील अधिकारांचा रेकॉर्ड तयार करावा. प्रत्येक ग्रामापासून किंवा महालापासून वसूल करावयाचा कर निश्चित केला जावा आणि कर वसूलीचे काम ग्राम प्रमुखाकडे किंवा लंबरदाराकडे (*Lambardar)* देण्यात यावे. १८२२ च्या नियम - ७ नुसार ह्या शिफारसीला कायदेशीर रुप देण्यात आले. त्यानुसार जमिनीचा जो भाडेदर जमीनदाराला द्यावा लागत होता त्याच्या ८०% भूमीकर निश्चित करण्यात आला. जेथे भूमीस्वामी जमीनदार नव्हते आणि जमीन शेतक-यांतर्फे संयुक्त तत्वाने पिकविली जात होती तेथे हा दर ९५% लावण्यात आला.

सरकारच्या ह्या अत्याधिक मागणीमुळे आणि कर संग्रहण पद्धतीच्या वाईट अंमलबजावणीमुळे वरील व्यवस्था नष्टभ्रष्ट होऊन गेली. (*The system broke down because of the excessive state demand and harshness in its working and collection of land revenue.)*

**१८३३ चे नियमन ९ आणि मार्टिन बर्डची भूमीकर व्यवस्था**

विलियम बेंटिंकच्या शासनाने १८२२ च्या योजनेचे खोल परिक्षण केले आणि हा निष्कर्ष काढला की, हया योजनेमुळे जनतेला अतिशय कष्ट झाले आणि आपल्या अत्यधिक कठोरतेमुळे ही योजना समाप्त झाली. विचारविनिमयानंतर १८३३ मधील नियमनाद्वारे भूमीचे उत्पन्न आणि भूमीदराचा अंदाज लावण्याचे एक सरळ पद्धती तयार करण्यात आली. वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनीसाठी दराची वेगवेगळी टक्केवार निश्चित केली गेली. प्रथमच शेताचे नकाशे आणि रजिस्टर्स यांचा उपयोग करण्यात आला.

ही नवी योजना मार्टिन बर्डच्या देखरेखीखाली लागू करण्यात आली. त्याला उत्तर भारतातील भूमीकर व्यवस्थेचा प्रवर्तक (*Father of Land-Settlements in Northern India)* असे म्हटल्या जाते ह्या योजनेअंतर्गत एकेका भागातील जमिनीचे सर्वेक्षण करून जमिनीचे क्षेत्रफळ, सीमा ठरवून त्यातील पिकाऊ जमीन व पडीत जमीन निश्चित केली जात होती, त्यानुसार संपूर्ण जमिनीचे व नंतर संपूर्ण ग्रामाचे भूमीकर ठरविले जात होते. प्रत्येक ग्रामातील किंवा महालातील अधिकाऱ्यांना स्थानिक गरजा लक्षात घेऊन समायोजन (*adjustment)* करण्याचा अधिकार होता. भाटकाच्या (*Rental Value)* ६६% भाग राज्य सरकारचा म्हणून ठरविण्यात आला आणि ही व्यवस्था ३० वर्षांच्या मुदतीची करण्यात आली,

ह्या योजनेनंतर भूमीव्यवस्थेचे कार्य १८३३ मधे सुरू करण्यात आले. जेम्स थॉम्पसनच्या लेफ्टनंट गव्हर्नर पदाच्या कार्यकाळात (१८४३-५३) हे काम समाप्त करण्यात आले.

परंतु भाटकाच्या ६६% भूमीकर फार जास्त असल्याने त्याची वसूली होऊ शकली नाही. म्हणून लॉर्ड डलहौसीने त्याचे पुनर्निरिक्षण करून १८५५ मधे सहारनपुर नियमानुसार ५०% चा प्रस्ताव दिला

दुर्दैवाने भूव्यवस्था अधिका-यांनी वरील नियम अंमलात न आणण्याचाच प्रयत्न केला. त्यांन (कदाचित जाणूनबुजून) नियमाचा चुकीचा अर्थ लावला व तसे स्पष्टीकरण दिले. परिणामी शेतकऱ्यांच्य दृष्टिने ही व्यवस्था अतिशय भारभूत सिद्ध झाली आणि असे असंतुष्ट शेतकरी आपल्या असंतोषाला वाच फोडण्यासाठी १८५७ च्या संघर्षात सामील झाले.

**रयतवारी पद्धती**

*(The Ryotwari System)*

ह्या पद्धतीनुसार प्रत्येक पंजीकृत (*Registered)* भूमी धारकाला भूमीस्वामी म्हणून मान्यता देऊन सरकारला सरळ कर देण्यास जबाबदार धरण्यात आले. त्याला आपली जमीन किरायाने देण्याच हस्तांतर करण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा विकण्याचा अधिकार होता. आपला भूमीकर तो सरकारल व्यवस्थित देत असेपर्यंत त्याचे अधिकार हिरावून घेतल्या जात नव्हते.

मद्रासमधील पद्धती - मद्रास इलाख्यात सर्वप्रथम भूमीव्यवस्था बारामहाल जिल्हा प्राप्त झाल्यानंत १७९२ मधे करण्यात आली. थॉमस मन्रोच्या मदतीने कॅप्टन रीडने शेतजमिनीच्या उत्पन्नाचा अंदाज बांधून त्याच्या ५०% भूमीकर निश्चित केला. हा कर संपूर्ण आर्थिक भाटकाच्या (*economic rent* अधिक होता. इतरही भागात ही पद्धती लागू करण्यात आली

**थॉमस मन्रो आणि मद्रासची भूव्यवस्था -**

मद्रासचा १८२० ते १८२७ पर्यंत गव्हर्नर राहिलेल्या थॉमस मन्रोने जुनी करपद्धती अयोग्य ठरविल त्याने एकूण उत्पन्नाच्या तिसरा भाग भूमीकर ठरवून कायम भूमी व्यवस्था असलेल्या प्रदेशांना वगळून बाकी संपूर्ण प्रांतात रयतवारी पद्धती लागू केली. पण हा करही संपूर्ण आर्थिक भाटकाइतकाच होता. र नगदी स्वरुपात द्यावा लागत होता आणि त्याचा प्रत्यक्ष झालेले उत्पन्न किंवा त्यावेळेचा बरनाव हयांचाही काहीही संबंध नव्हता. परिणामी शेतकऱ्यांवर जास्तीचा भार पडला.

मन्रोची ही भूमीकर व्यवस्था जवळजवळ ३० वर्षे होती त्यामुळे मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण व शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. आपल्या दरिद्री अवस्थेमुळे कर देण्यासाठी करी शेट्टींच्या (*money lender)* विळख्यात सापडले. भूमी कर गोळा करण्याची पद्धती अतिशय होती आणि त्यासाठी शेतकऱ्यांना यातना सहन कराव्या लागत. ह्या यातनांच्या वार्ता थेट लडच्या संसदेत पोहचून त्यावर तेथे प्रश्न विचारण्यात आले. उपाशी ठेवणे, नैसर्गिक कार्याला जाऊ न बाकलेल्या स्थितीत ठेवणे, म्हशीच्या किंवा गाढवाच्या शेपटीला त्या व्यक्तीचे केस बांधणे, गळ्यात बडांचे हार घालणे व अशाच प्रकारच्या यातना आणि अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली जात असे. १८५५ मधे एकूण उत्पन्नाच्या ३०% आधार ठरवून विस्तृत सर्वेक्षण व भूव्यवस्था हयांची योजना लागू करण्यात आली. प्रत्यक्ष कार्याला प्रारंभ १८६१ मधे झाला. १८६४ च्या नियमानुसार राज्याचा वाटा। माटकाच्या ५०% इतका मर्यादित करण्यात आला. पण हा नियम कागदावरच राहिला आणि प्रत्यक्ष भीषण दुष्काळात तेथील शेतक-यांची वास्तविक स्थिती समोर आली.

## मुंबईची स्थिती -

मुंबईमधील पद्धती मुंबई इलाख्यात सुद्धा रयतवारी पद्धती लागू करण्याचा निर्णय कंपनीने बतला जेणेकरून नफ्याचा वाटा जमीनदारांच्या किंवा ग्रामसमाजाच्या घशात जाणार नाही.

**एलफिन्स्टन व चॅप्लीनचे अहवाल -**

एलफिन्स्टन १८१९-२७ हया काळात मुंबईचा गव्हर्नर होता. पेशव्याकडून मिळविलेल्या प्रदेशासंबंधी त्याने १८१९ मधे एक विस्तृत अहवाल दिला. त्यात त्याने मराठा प्रशासनाच्या दोन मुख्य गोष्टींकडे अंगूलीनिर्देश केला. (१) स्थानिक प्रशासन चालविण्यासाठी ग्राम सभांचे असलेले अस्तित्व. (२) मिरासी भू-धारणपद्धतीचे अस्तित्व (मिरासदार वंशपरंपरेने आपली जमीन कसत आणि शासनाला उरलेला भूमी कर देत.) दक्षिणचा कमिश्नर असलेल्या चॅप्लीनने १८२१ व १८२२ मधे आपले दोन अहवाल दिले. त्यात भूमीकराच्या जुन्या पद्धतीचे वर्णन करून काही महत्वाच्या सूचना केल्या. त्यानंतर १८२४-२८ दरम्यान प्रिंगलने भूमीचे नियमित सर्वेक्षण केले आणि निव्वळ उत्पन्नाच्या ५५% भाग सरकारचा हिस्सा म्हणून निश्चित केला. पण बहुतांश सर्वेक्षण दोषपूर्ण होते व उत्पन्नाचा केलेला अंदाज बरोबर नव्हता. परिणामी भूमीकर जास्त निश्चित करण्यात आला व त्यामुळे शेतकरी अधिकच त्रस्त झाले. अनेक शेतकऱ्यांनी पिके घेणे बंद केले व जमिनीचे फार मोठे क्षेत्र उजाड बनले.

**विनगेटचे सर्वेक्षण आणि मुंबईमधे रयतवारी पद्धती —**

१८३५ मधे अभियांत्रिकी डेव्हिडसन व गोल्डस्मिट हह्यांची स्वाक्षरी होती. विभागातील अधिकारी लेफ्टनंट विनगेट ह्याला भूमी सर्वेक्षणाचा अधिक्षक नियुक्त करण्यात आले. त्याने १८४७ मधे सादर केलेल्या अहवालावर ढोबळमानाने एका जिल्हयाचा भूमीकर त्याच्या व्यतिरिक्त कॅप्टन म्हणून *capacity)* हयावर अवलंबून होता, शेतकऱ्याच्या ताब्यात असलेल्या पूर्ण जमिनीवर नव्हे. त्यामुळे शेतकरी सोडून देऊ शकत होता. ही व्यवस्था ३० वर्षांसाठी करण्यात आली. परंतु ह्या व्यवस्थेतही दोष होता आणि तो म्हणजे ही व्यवस्था काही प्रमाणात अंदाजावर आधारलेली होती आणि कडकपणाकडे झुकलेली होती.

भूमीच्या पुनर्व्यवस्थेचे कार्य (*re-settlement)* ३० वर्षानंतर १८६६ मधे सुरु करण्यात आले. त्यावेळी अमेरिकेतील गृहयुद्धामुळे (१८६१-६५) काही काळापुरता मुंबईच्या कापसाचा भाव वधारला होता. त्याचाच फायदा घेऊन सर्वेक्षण करणाऱ्या अधिका-यांनी संधी सोडली नाही आणि भूमीकर ६६% पासून १००% पर्यंत नेला. शेतकऱ्यांना न्यायालयात अपीलही करता येत नव्हते.

हया जुलूमामुळे १८७५ मधे दक्षिणेतील शेतकऱ्यांमधे ब्रिटीशविरोध उफाळून आला. म्हणून सरकारने • १८७९ मधे दक्षिण मदत अधिनियम (*Deccan Agriculturists Relief Act)* संमत केला ज्यानुसार शेतकऱ्यांना सावकारांपासून संरक्षण देण्यात आले. मात्र सर्व प्रकारणाचे मूळ असलेला अत्यधिक भूमीकर जसाच्या तसाच होता.

मुंबईमधे लागू करण्यात आलेल्या रयतवारी पद्धतीचे प्रमुख दोष (१) खूप जास्त भूमीकर आणि (२) भूमीकराची अनिश्चितता हे होते. जास्तीचा भूमीकर लावल्यास न्यायालयात अपील करण्याचा अधिकार शेतकऱ्यांना नव्हता. कलेक्टरला अधिकार देण्यात आला की, त्याने नव्या प्रस्तावित भूमीकराची कल्पना शेतकन्याला द्यावी आणि तो भूमीकर शेतकऱ्याला मान्य नसेल तर त्यास जमीन सोडून देण्यास सांगावे.

**ग्रामीण अर्थव्यवस्था अस्ताव्यस्त**

ईस्ट इंडिया कंपनीच्या भूमीकर पद्धतींचा, विशेषकरून अत्यधिक करांचा तसेच नव्या प्रशासकीय आणि न्यायालयीन व्यवस्थेचा परिणाम म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था अस्ताव्यस्त होऊन गेली. भूमीव्यवस्था आणि न्याय हे ग्रामपंचायतींचे मुख्य कार्य समाप्त होऊन पाटील म्हणजे फक्त सरकारमार्फत कर गोळा करणारा बनला होता. त्यामुळे खेड्यांची जुनी राजकीय, सामाजिक, आर्थिक जडणघडण राहिली नाही. भारतातील कुटीरोद्योग जवळजवळ संपुष्टात आले आणि खेड्यात सर्वात जास्त महत्व जमिनीला प्राप्त झाले. नव्या भूमीव्यवस्थेमुळे भूमी आणि शेतकरी दोन्ही घटक अस्थिर (*mobile)* बनले. परिणामी खेड्यांमधे सावकार आणि अनुपस्थित जमीनदार (*absentee Landlords)* हे दोन घटक उदयास आले. एकोणविसाव्या शतकातील राष्ट्रीय विचारवंतांचे हेच म्हणणे होते की,

रयतवारी पद्धती आणि जमीनदारी पद्धती हया दोहोतही सरकारने लागू केलेला भूमीकर फारच जास्त आहे. भूमीकर वेळच्या वेळी न दिल्यास सरकार जमीनदाराची किंवा रयतेची जमीन जप्त करून ती शहरातील व्यापाऱ्यांना विकून टाकी. ही नवी मंडळी स्वतः शेतकरी नसल्याने जमीन दुस-यांना कसायला देत व जास्तीत जास्त लाभमिळविण्याचा प्रयत्न करित.

ह्या सर्व परिस्थितीमुळे खेड्यात जमीनदार आणि सावकारांचे महत्व अतोनात वाढले. कारण शेतकरी वर्ग त्यांच्यात कृपेने व दयेने जगत होता. छोटे छोटे शेतकरी (अल्प भू - धारक), मजूर, भूमीहिन शेतकरी हयांची संख्या (ग्रामीण श्रमिक वर्ग *proletariate)* वाढू लागली, परस्पर सहकार्याची भावना लोप पावून परस्पर स्पर्धा आणि वैयक्तिक लाभ असे वातावरण निर्माण झाले. भांडवलशाही निर्माण होण्याची ती प्रारंभिक लक्षणे होती. अशा बदलत्या स्थितीत खूप पैसा लागणारी उत्पादनाची नवनवीन साधने, मुद्रा अर्थव्यवस्था (*money economy)* शेतीचे व्यापारीकरण, दळणवळणातील सुधारणा, जागतिक बाजारपेठेशी संबंध हह्या आणि अशाच प्रकारच्या तत्वांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि भारतीय कृषीक्षेत्राल एक नवे रुप प्रदान केले.

*The Government of an exclusive company of merchants is perhaps the worst of all governments for any country whatever.*
*- Adam Smith.*

सी.पी.इलबर्टचे (इलबर्ट लॉर्ड रिपनच्या (१८८०-८४) कौन्सिलमधे कायदा सदस्य होता. इलबर्ट विधेयकावर झालेल्या मतभेदामुळे आणि आपले पुस्तक *'The Government of India' (claredon Press, 1898)* हयासाठी तो प्रसिद्ध आहे.) हे प्रतिपादन योग्यच आहे की, भारतातील ब्रिटीश सत्तेच्या विकासाच्या इतिहासाचे खालील तीन कालखंड आहेत.

(१) १७ व्या शतकाच्या प्रारंभापासून १७६५ पर्यंत. ह्या काळात ईस्ट इंडिया कंपनी एक व्यापारी मंडळ म्हणून कार्यरत होती आणि तिचे इतर युरोपियन व्यापारी कंपन्यांशी शत्रूत्व होते. (२) १७६५ ते १८५८ ह्या काळात कंपनीने अनेक प्रदेश जिंकून त्यावर आपली पकड मजबूत केली आणि सत्तेमधे ब्रिटीशराजपदाबरोबर आपलाही वाटा ठेवला आणि हळूहळू आपले व्यापारी अधिकार व विशेषाधिकार गमाविले. (३) १८५८ नंतर ईस्ट इंडिया कंपनीचे उरलेले अधिकार ब्रिटीश राजपदाकडे हस्तांतरित झाले.

ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीतर्फे भारतात आलेल्या व्यापाऱ्यांचा उद्देश व्यापार करणे आणि त्यातून जास्तीत जास्त नफा कमाविणे हा होता. पण त्याचवेळी भारतात कार्यरत असणाऱ्या डच ईस्ट इंडिया कंपनीकडून व फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीकडून जोरदार स्पर्धेला तोंड द्यावे लागल्याने ब्रिटीश कंपनीच्या व्यापारावर व नफ्यावर मर्यादा घातली गेली. त्याला पर्याय व सर्वोत्तम मार्ग म्हणजे भारतीय व्यापारक्षेत्रातून ड्या स्पर्धक कंपन्यांना समाप्त करणे होय. परिणामी ब्रिटीश आणि डच व फ्रेंच कंपन्यांमधे संघर्ष झाले आणि त्यात १७६३ पर्यंत ब्रिटीश कंपनीने पूर्ण विजय प्राप्त केला, त्यानंतर भारताच्या परराष्ट्र व्यापारावर ब्रिटीश कंपनीचा जवळजवळ एकाधिकार प्रस्थापित झाला, पण आता कंपनीच्या आकांक्षांना मर्यादा उरल्या नाही. भारताच्या राजकीय सत्तेवर नियंत्रण मिळवून त्याद्वारे देशाची अर्थव्यवस्था आपल्या नियंत्रणाखाली आणून जास्तीत जास्त नफा मिळविणे हे कंपनीचे पुढील ध्येय बनले.

युद्ध व्यापारी मंडळाकडून व्यापारी आणि राजकीय मंडळ अशी कंपनीची वाटचाल सुरू झाली तेंव्हा कंपनीच्या लक्षात आले की, व्यवस्थित प्रशासकीय व्यवस्था असल्याशिवाय प्रदेशांवर पकड ठेवणे व राज्यकारभार चालविणे शक्य नाही. (*As the English Company was transformed from a purely commercial body into a commercial-cum-political body, it was realised that it could not hold and govern territories effectively unless it evolved a suitable system of administration.)* पण कंपनीने निर्माण केलेली प्रशासकीय व न्यायालयीन पद्धती फारशी परिणामकारक नव्हती. म्हणून भारतात प्रचलित असलेली प्रशासकीय पद्धती कंपनीच्या अधिका-यांना

स्विकारावी लागली आणि त्यात आवश्यक ते बदल करण्यात आले. ऑक्सफर्ड विद्यापीठातील विद्वान ज्युडिथ एम. ब्राऊन म्हणतात की, वेगळ्या अर्थाने उपखंडात जिंकलेल्या प्रदेशात कंपनी बंधनात होती आणि १८ व्या शतकाच्या शेवटी आणि १९ व्या शतकाच्या प्रारंभी त्यात बदलाची प्रक्रिया सुरु झाली.

भारतात इंग्लंडच्या राजपदाची सार्वभौम सत्ता प्रस्थापित झाल्याने इंग्लंडमधील प्रशासकीय व्यवस्थेचा भारतीय प्रशासकीय पद्धतीवर परिणाम होणे अपरिहार्य होते. उदा. सुधारणा काळात इंग्लंडमध्ये जेरेमी बॅथम, डेव्हिड रिकार्डो, जे. एस. मील ह्यांचा 'उपयुक्ततावाद' *(utilitarianism)* लोकप्रिय ठरला व स्विकारला गेला, शासनाचा प्रकार, करपद्धती, न्यायालयीन प्रशासन इ. गोष्टींबाबतच्या उपयुक्ततावादाच्या कल्पनांचा भारताच्या संदर्भातही प्रभाव पडलेला आढळतो. त्यात धर्मप्रचारकांचा उत्साह, ब्रिटीश उत्पादक आणि व्यापारी यांचे हितसंबंध ह्यांची भर पडत गेली. इंग्लंडच्या आर्थिक विकासाबरोबरच भारतातील इंग्लंडचे साम्राज्यवादी हितसंबंधही वेळोवेळी बदलत गेले. जसे १८१५ पर्यंत कृषीक्षेत्रातून जास्तीत जास्त फायदा उपटण्यासाठी भारतातील तत्कालीन संस्था आणि प्रशासकीय व्यवस्था स्विकारणे कंपनीची एक गरज होती. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे सर्वत्र सारखीच प्रशासकीय व्यवस्था लागू करण्याची, आधुनिक न्यायालयीन व्यवस्था निर्माण करण्याची गरज वाटली नाही, १८१५ नंतर मात्र इंग्लंडमधे औद्योगिक क्रांतीने वेग घेतल्यावर तेथील अर्थव्यवस्था व समाज हयात मोठे परिवर्तन घडून आले. परिणामी इंग्लंडमधील उद्योगपती त्यांचे उत्पादन खपविणारी मोठी बाजारपेठ म्हणून भारताकडे पाहू लागले. त्याचबरोबर भारत म्हणजे कापूस, ज्यूट, इ. कच्चा माल पुरविणारा देश बनला. तसेच अफू व खाद्यपदार्थांच्या निर्यातीने भारतापासून खूप नफा कमाविणे शक्य झाले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था आणि समाज ह्यावर आघात करून भारतीय व्यापारावर नियंत्रण मिळविण्याची निकड निर्माण झाली. बदलत्या परिस्थितीने विशेषतः वरील घटकांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत, प्रशासनात व न्याय पद्धतीत महत्वाचे बदल घडून आले.

प्रशासकीय व्यवस्थेत आणि धोरणात बदलाची ही प्रक्रिया १८५८ नंतर म्हणजे भारताची सत्ता ब्रिटीश राजपदाकडे गेल्यानंतरही सुरु होती. अर्थात ब्रिटीशांचे वसाहतींचे हितसंबंध सुरक्षित ठेवणे हाच् त्यामागील मुख्य उद्देश होता.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे इंग्लंड सरकार, भारत सरकार, आर्थिक व राजस्व प्रशासन, नागरी सेवा संघटन, न्यायालयीन पुनर्रचना, आर्थिक धोरणातील बदल, सामाजिक कायदे व शिक्षणधोरण ह्यासारख्या ईस्ट इंडिया कंपनीशी संबंधित सर्व गोष्टी योजनापूर्वक होत्या आणि काळानुसार त्यात बदल केले जात. त्यामागील महत्वाचा हेतू भारतात ब्रिटीश सत्ता मजबूत बनविण्याबरोबरच भारतीय वसाहतीतून जास्तीत जास्त आर्थिक फायदे उकळणे हा होता.

### गृह सरकार (*Home Government*) -

लंडनस्थित कंपनीचे प्रशासकीय कामकाज पहाण्यासाठी २४ संचालकांचे (*Court of Directors*एक मंडळ होते. ह्या संचालकांची निवड दरवर्षी कंपनीच्या भागधारकांकडून (*Court of Proprietors* होत असे. दैनंदिन कामाच्या दृष्टीने संचालक मंडळामधून वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात येत. हळूह कंपनीची सत्ता आणि विशेषाधिकार हह्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले; त्यात काही वाढ करण्य आली, नंतर निरिक्षण व नियंत्रण आणि शेवटी कपात अशी प्रक्रिया सम्राट आणि संसदेच्या कायद्याद्वारे करण्यात आली.

### भारत सरकार -

सी.पी. इल्बर्टच्या मते, भारतात कंपनीच्या अधिकारांचे दोन स्त्रोत होते. (१) इंग्लंडचा राजा इंग्लंडची संसद हह्यांच्याकडून प्राप्त झालेली परवानगी. (२) मुगल सम्राट आणि इतर भारतीय शासकांकडून मिळालेले अधिकार, कंपनीला द्यावयाचे अधिकार आणि विशेषाधिकार हयासाठी इंग्लंडमधे वेळोवेळी अधिनियम, कायदे करण्यात आले. उदा. नियामक कायदा (१७७३), संशोधन कायदा (१७८१), पिटचा भारत कायदा (१७८४), भारत सरकार अधिनियम

(१८५८) भारतात शासकांनी कंपनीला वेळोवेळी काही सवलती दिल्या. कधीकधी हया सवलती नैतिक व राजकीय दबाव आणून जबरदस्तीने पदरात पाडून घेतल्या जात यामुळे कंपनी आणि ब्रिटीश राजपद भारताच्या काही प्रदेशांचे स्वामी बनले.

१६३९ मधे वांदीवाशच्या स्थानिक अधिका-यांनी मद्रासचा कारभार इंग्रजांकडे सोपवून त्यांना तेथे किल्ला बांधण्याची व शिक्के चालविण्याची अनुमती दिली. त्यानंतर मुगल अधिकाऱ्यांनी मद्रासचे वांधिकार कंपनीला दिले. १६६८ मधे इंग्लंडचा राजा चार्ल्स द्वितीयने एका अधिनियमाद्वारे मुंबई बेट आणि बंदर वार्षिक १० पौंडस् किरायाने कंपनीला दिले. (१६६१ मधे चार्ल्स द्वितीयचा विवाह पोर्तुगालच्या गाऱ्जाची राजकुमारी कॅथेरिन हिच्याशी झाला. त्यावेळी त्याला पोर्तुगालकडून मुंबई बेट आंदण म्हणून नळाले.) हयाचप्रकारे कृपनीने बंगालचा सुभेदार अजीमुश्शान हयाच्याकडून कालीकता, सुतनौती व बिंदपूर (आजचे कलकत्ता) ह्या गावांची जमीनदारी मिळविली व त्याऐवजी जमिनीच्या मूळ मालकांना २०० रु. मोबदला दिला. १७१७ मधे मुगल सम्राट फर्कखसियरने एक फर्मान काढून कलकत्त्याच्या बाजूबाजूचे क्षेत्र किरायाने घेण्याची परवानगी कंपनीला दिली. २० जून १७५६ च्या अंधारकोठडीच्या दुर्घटनेनंतर (*Black Hole Tragedy*) इंग्रज सैन्याने कलकत्त्याला वेढा घातला. तेव्हा नबाब सिराजउद्दौलाने हताश होऊन फोर्ट विलियम इंग्रजांकडे सोपविला. तसेच किल्ल्याची डागडुजी करण्याची व शिक्के चलविण्याची परवानगी दिली.

भारताच्या पूर्व आणि पश्चिम तटावर कंपनीच्या ज्या वखारी होत्या तसेच वस्त्या होत्या त्यांचे प्रशासन चालविण्यासाठी विशेषतः मद्रास, कलकत्ता आणि मुंबईसाठी स्वतंत्र असे गव्हर्नर होते व त्यांच्या स्दतीसाठी कंपनीच्या उच्च अधिका-यांचे एक मंडळ होते. गव्हर्नर व त्याचे मंडळ संयुक्तरित्या बहुमताने निर्णय घेत व तशा प्रकारचे आदेश जारी करत. तीनही गव्हर्नर आपल्या क्षेत्रात पूर्णतः स्वतंत्र होते आणि आपल्या कामाबाबत लंडनस्थित कंपनीच्या संचालकांना जबाबदार होते.

प्लासी आणि बक्सारच्या युद्धानंतर कंपनीचे अधिकारी, संचालक, भागधारक आणि इंग्लंड नरकार हयांच्या लक्षात आले की, आपल्याला सोन्याची खाण गवसली आहे. सर्वांनीच ह्या लुटीत भाग बेतला आणि जेव्हा कंपनीचे आर्थिक दिवाळे निघाले तेव्हा १७७२ मधे कंपनीने इंग्लंड सरकारकडे १० लक्ष पौडस्चे कर्ज मागितले. त्यामुळे कंपनीच्या अंतर्गत कारभाराची तपासणी करण्याची व कंपनीचे नियंत्रण करण्याची संधी इंग्लंडच्या संसदेला मिळाली. परिणामतः १७७३ चा नियामक कायदा करून कंपनीवर बंधने घालण्यात आली. संचालक मंडळ दर ४ वर्षांनी निवडावे, भारतीय करासंबंधीच्या बाबी ब्रिटीश अधिकाऱ्यांसमोर (*British Treasury*) ठेवाव्या आणि भारतातील नागरी व लष्करी प्रशासनाची संपूर्ण माहिती द्यावी अशा प्रकारची बंधने होती. ह्याशिवाय नियामक कायद्यात (*Regulating Act*) गव्हर्नर जनरल व याच्या सहाय्यासाठी ४ सदस्यीय कौंसिल बनविण्याची तरतूद होती. ह्या सर्वांना एकत्ररित्या बहुमताने निर्णय घ्यावयाचा होता. गव्हर्नर जनरल प्रामुख्याने बंगालसाठी असला तरी त्याला मद्रास व मुबई इलाख्याचे काही अधिकार प्रदान करण्यात आले.

१७८४ च्या पिटच्या भारत कायद्याद्वारे ब्रिटीश संसदेचे कंपनीवरील नियंत्रण अधिकच वाढविण्यात आले. त्यादृष्टीने इंग्लंडमधे एक नियंत्रण मंडळ (*Board of Control*) स्थापन करण्यात आले. त्याचा अध्यक्ष वित्तमंत्री रहात होता. कंपनीच्या भारतीय कारभारावर लक्ष ठेवणे नियंत्रण मंडळाचे कार्य होते. भारतातील प्रशासकीय पत्रव्यवहार, तत्संबंधीचे आदेश इ. तपासण्याचा अधिकार नियंत्रण मंडळाला देण्यात आला. भारताच्या गव्हर्नर जनरलच्या मदतीसाठी असलेल्या कौंसिलची सदस्य संख्या ४ ऐवजी ३ करण्यात आली. भारतातील कंपनीच्या लष्कराचा मुख्य सेनापती त्यापैकी एक सदस्य होता. पुढे १८३३ मधे कायदा सदस्य (*Law member*) वाढविण्यात आल्याने कौंसिलची सदस्यसंख्या पुन्हा ४ झाली.

१८१३ च्या चार्टर कायद्यानुसार इंग्लंडच्या संसदेने कंपनीचा भारताच्या व्यापाराचा एकाधिकार समाप्त केला. पण त्याला चीनशी व्यापार आणि चहाचा व्यापार हे दोन अपवाद ठेवण्यात आले. १८३३ च्या चार्टर कायद्यानुसार कंपनीला आज्ञा करण्यात आली की, कंपनीने भारतातील व्यापारी व्यवहार लौकरात लौकर बंद करून फक्त प्रशासनाकडे लक्ष द्यावे ज्याची जबाबदारी कंपनी इंग्लंडचा सम्राट आणि त्याचे उत्तराधिकारी यांच्या मार्फत विश्वस्त हथा रुपाने सांभाळत आहे.

१८३३ च्या चार्टर कायद्याद्वारे भारतातील कायदाविभागाचे केंद्रीकरण करण्यात आले. मद्रास व मुंबईच्या गव्हर्नरचे विधेयक संमत करण्याचे अधिकार काढून घेऊन त्यासंबंधीचे पूर्ण अधिकार गव्हर्नर जनरल व त्याच्या कौंसिलला देण्यात आले. ही व्यवस्था कंपनीची भारतातील सत्ता समाप्त होईपर्यंत म्हणजे १८५८ पर्यंत कायम होती.

**आर्थिक व कर प्रशासन**

प्लासी आणि बक्सारच्या लढाईत विजय प्राप्त केल्यानंतर कंपनी एक व्यापारी, लष्करी व राजकीय शक्ती म्हणून बंगालमधे उदयास आली आणि त्याचा उपयोग भारतातून जास्तीत जास्त नफा कमाविण्यासाठी कंपनीने करून घेतला. हळूहळू संपूर्ण भारतात आपली सत्ता असण्याची आकांक्षा इंग्रजांमधे बळावली. भारतातील विभिन्न प्रदेश जिंकण्यासाठी व त्यावर आपली पकड मजबूत ठेवण्यासाठी विशाल सैन्याची आवश्यकता होती. हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अर्थातच प्रचंड धनाची गरज होती आणि हे धन भारतीय संपत्तीचे योजनाबद्ध व सातत्याने शोषण करूनच मिळणे शक्य होते.

जमिनीपासून मिळणारा कर हे भारतातील उत्पन्नाचे परंपरागत साधन होते. ज्युडिथ एम. ब्राऊन योग्यच म्हणतो की, "मुगल सत्तेचा मुख्य आर्थिक पाया शेतीवरील कर होता. ब्रिटीश सत्तेसाठी तो अत्यंत महत्वाचा ठरला, अगदी विसाव्या शतकापर्यंत." (*Land revenue had been the financial founda- tion of Mughal raj; it was to be crucial to the British raj well into the twentieth century* उत्पन्नाची इतर साधने सीमा व अबकारी शुल्क, अफू व मिठाचा व्यापार व त्यावरील एकाधिकार, भारतीय शासकांकडून मिळणारा कर, जंगलांमधून मिळणारी आय, प्रांतांकडून मिळणारा पैसा आणि स्टैंपकर इ होती.

**भूमीकर धोरण (*Land Revenue Policy*)**

राज्याच्या एकूण उत्पन्नाच्या अर्ध्यापेक्षा जास्त उत्पन्न भूमीकरापासून मिळत असल्याने आणि त्यात वाढ करण्यास वाव असल्याने सुरूवातीच्या इंग्रज शासकांनी भूमीकराकडे जास्त लक्ष दिले. भूमी स्वामित्वाच्या नव्या कल्पना लागू करणे, भूमी किरायाचे नवे कायदे करणे तसेच जास्तीत जास्त भूमीकराची मागणी करणे ह्याव्यतिरिक्त भारतातील वसाहतवादी शासकांनी भूमीकर अवधीसंबंधी दूरगामी बदल केले. प्रामुख्याने भूमीकराच्या तीन पद्धती (प्रकार) होत्या; जमीनदारी व्यवस्था, महालवारी पद्धती आणि रयतवारी पद्धती. कायम जमीनदारी व्यवस्था (*Permanent Settlement)* १८ व्या शतकात बंगाल, बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेशातील बनारस विभाग, उत्तर कर्नाटकीय प्रदेश येथे लागू करण्या आली. त्यात भूमीकरात भविष्यात कोणतीही वाढ होऊ शकत नव्हती. परिणामी महालवारी पद्धती विकसित झाली ज्यात भूमीकर १० ते ४० वर्षांच्या कालावधीसाठी ठरविला जात होता. ही पद्धती उक्त प्रदेश, मध्य भारत, पंजाबमधे अंमलात आली. हयापेक्षाही लवचिक पद्धती रयतवारी होती ज्यात जमिनीच्य पंजीबद्ध मालकाबरोबर निश्चित भूमीकर देण्याचा करार केला जात असे. त्याला ही रक्कम सरक सरकारला द्यावी लागत होती. ह्या पद्धतीत जमीनदार वगैरे कोणीही मध्यस्थ नव्हता. रयतवारी पद्धत

मुंबई, मद्रास आणि आसाम प्रांतात तसेच भारताच्या इतर भागात लागू करण्यात आली आणि ह्या पद्धतीने चारताचे अर्धे क्षेत्र व्यापून टाकले. भूमीकरापासून मिळणारी आय हळूहळू कशी वाढत गेली हयासंबंधी आर.सी. दत्त (*R.C.Dutt)* बानी खालील आकडेवारी दिली आहे.

१८५८-५९ मधे भूमीकरापासूनचे उत्पन्न सरकारच्या एकूण उत्पन्नाच्या जवळजवळ ५०% होते.

सारांश ईस्ट इंडिया कंपनीच्या भूमीकर पद्धतीची प्रमुख वैशिष्ट्ये अत्यधिक कराची मागणी, वसूलीत कठोर व्यवहार (दुष्काळाच्या स्थितीतही) ही होती. ह्याशिवाय भ्रष्ट न्यायव्यवस्था आणि प्रशासकीय वस्थेने संपूर्ण भारताची अर्थव्यवस्था पोखरून टाकली. काही ठिकाणी जमीनदारांचा फायदा झाला तेल पण प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांना अतिशय वाईट स्थितीला तोंड द्यावे लागले आणि ते दारिद्रियरेषेच्या चली ढकलल्या गेले. ग्रामीण भागाची अविकसित अवस्था आणि मागासलेपण ब्रिटीश वसाहतवादी नाची देणगी होय. (*Rural under development and backwardness is a legacy of British Colonial rule.)*

**मीठावरील कर**

ईस्ट इंडिया कंपनीचा मीठाच्या व्यापाराचा एकाधिकार होता. त्यापासून नीला खूप नफा होता, कंपनीच्या प्रदेशातील मीठ उत्पादकांवर जास्त कर लावला जाई. तसेच चत्रणाखालील भारतीय प्रदेशातून ब्रिटीश प्रदेशात मीठ आयात करण्यास खूप जास्त आयात कर दल्या जात असे. कोरोमंडल व मलबार किना-यावर सागरी पाण्याला सुकवून मीठ तयार केले जाई. तयार करणारे सरकारकडून परवाना मिळवित आणि ते मीठ ठरलेल्या किंमतीत ठोक व्यापाऱ्यांना जून नफा कमावित असे.

सुरूवातीला १०० पौंड मीठावर ७ रु. कर (*the monopoly price)* लावल्या जात होता. जांतराने त्यात अत्यधिक वाढ करण्यात आली. बंगालमधे मीठाची गरज इंग्लंडमधून आयात करून पूर्ण जात होती. खरे तर मद्रासमधे जास्तीचे मीठ होते आणि ते बंगालमधे पाठविले जाऊ शकत होते. बंगालला जास्त भाव देऊनच मीठ आयात करावे लागत होते. १८१० मधे मद्रास सरकारला ३ अरब मीठ बंगालला निर्यात करण्याची परवानगी मिळाली. त्यात कपात करून १८५३ मधे तो आकडा २००० पौंडवर आणण्यात आला.

मीठ अगदी प्राथमिक स्वरुपाची गरज होती व सर्वांसाठीच ते आवश्यक होते. तरीही मीठावर कर जे म्हणजे घृणास्पद कृत्य होते आणि त्याचा फटका गरीब जनतेला बसत होता. १८५० मधे मद्रासच्या जस्व मंडळाने असा अंदाज केला की, ६ सदस्य असलेल्या एका गरीब मजूराच्या कुटुंबाला दरवर्षी १८ मीठाची गरज आहे आणि त्यावर त्याला जवळजवळ संपूर्ण वर्षाचे सरासरी एक महिन्याचे वेतन खर्च वे लागते, कंपनीला १७९३ मधे मीठापासून वार्षिक ८,००००० पौंडस् उत्पन्न मिळाले होते ते १८४४ - वाढून १३,००००० पौंडस् एवढे झाले.

**अफूपासून उत्पन्न** —

१८५८ मधे कंपनीला एकूण उत्पन्नाच्या ७% उत्पन्न मीठावरील करापासून तर त्याचवर्षी कंपनीने एकूण उत्पन्नाच्या १७% अफूवरील एकाधिकार करापासून मिळविले, बनारस व पाटण्याबरोबर भारतातील संस्थांनांमधेही अफूचे उत्पादन होत होते. कंपनी अफू विकताना २००% नफा कमवित होती. बंगाल आणि मुंबई सरकारेही अफू व्यापारातील दळणवळणातून बराच नफा मिळवित होती.

· अफूच्या व्यापारातील सर्वात घृणित व्यवहार म्हणजे चीनने अफू खरीदणे बंद करताच इंग्लंडने चीनशी युद्ध केले. (अफूचे युद्ध १८३९-४०) आणि त्यात चीनचा पराभव करून त्याला जबरदस्तीने अफू खरीदण्यास बाध्य केले तसेच चीनच्या बाजारात अफू विकण्याची संमती मिळविली.

**सिव्हिल सर्व्हिसचे संघटन**

ईस्ट इंडिया कंपनीचे एक महत्वपूर्ण कार्य म्हणजे निश्चित नियमांनुसार काम करणाऱ्या कुशल प्रशासकीय सेवांचे संघटन होय. इंग्रजपूर्व स्थितीपेक्षा नवी संरचना भिन्न स्वरुपाची होती. इंग्रजपूर्व काळात प्रशासनात वैयक्तीक इच्छा, आवडनिवड यांना प्राधान्य दिले जात असे.

कंपनीच्या सुरुवातीच्या काळात वरिष्ठ आणि कनिष्ठ व्यापारी प्रशासकीय कामकाज पहात असत. आपल्या खास अधिकारांचा वापर करून इंग्लंडमधील कंपनीचे संचालक मंडळ आपल्या मित्रांना कधीकधी आपल्या मुलांना प्रशासकीय सेवेसाठी भारतात पाठवून देत होते. त्यासाठी प्रसंगी पैसेही घेतले जात. वेतन फार कमी होते. त्यामुळे कर्मचारी लांच घेण्यास प्रवृत्त होत. भ्रष्टाचारावर नियंत्रण आणण्यासाठी वॉरेन हेस्टिंग्जने कंपनीच्या कर्मचा-यांचे वेतन वाढविले. त्यामुळे प्रशासनावरील खर्च वाढला पण त्यात कार्यक्षमताही आली नाही आणि भ्रष्टाचारही कमी झाला नाही. लॉर्ड कॉर्नवॉलिसने उच्च पदांवर फक्त युरोपियनांचीच नियुक्ती करण्याचे धोरण ठेवले. प्रशासकीय सेवेतील वेतनही त्याने वाढविले मात्र सेवांमधील निवड पद्धतीची तसेच आवश्यक त्या प्रशिक्षणाची व्यवस्था कॉर्नवॉलिसने केली नाही. प्रथमच ह्या संबंधात लॉर्ड वेलस्लीने पाऊल उचलले. त्याने प्रशासकीय कर्मचा-यांच्या (*Civil Servants)* प्रशिक्षणासाठी १८०० मधे कलकत्त्याला फोर्ट विलियम महाविद्यालय सुरु केले. येथे कंपनीच्या अधिकाऱ्यांना साहित्य, विज्ञान आणि भारतीय भाषांचे शिक्षण दिले जात होते. ही गोष्ट संचालक मंडळाला आवडली नसली तरी अधिकाऱ्यांना भारतीय भाषांची माहिती देण्याचे कार्य हया महाविद्यालयातर्फे १८५४ पर्यंत सुरु होते. तरीही संचालकांच्या सुचनेवरून भारतातील प्रशासकांसाठी १८०६ मधे इंग्लंडमधील हेलीबरी (*Haileybury)* येथे इस्ट इंडिया कॉलेज स्थापन करण्यात आले. भारतात नियुक्ती होण्यापूर्वी येथे संबंधित तरुणांना २ वर्षे प्रशिक्षण घ्यावे लागत असे.

भारतियांसाठी मात्र कंपनीच्या अधिकारपदाच्या जागा बंद होत्या. १८३३ च्या चार्टर कायद्यातील कलम ८७ नुसार असे म्हटले होते की, कंपनी प्रशासकीय सेवेबद्दल वर्णभेद करणार नाही. पण ही घोषणा कागदावरच होती, प्रत्यक्ष अंमलात आली नाही. परिणामी उच्च पर्दावर भारतियांची नियुक्ती झाली नाही. त्यानंतर १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यातही, "धर्म, पंथ, जात, वर्ण हयांचा विचार न करता कोणत्याही पदासाठी फक्त गुणवत्तेचा विचार केला जाईल" असे आश्वासन देण्यात आले. परंतु ही घोषणाही पाण्यावरील रेष सिद्ध झाली आणि उच्च प्रशासकीय जागा फक्त गौरवर्णियांच्याच वाट्याला आल्या भारतीय जनतेचे समाधान करण्यासाठी, निदान त्यांना तसे भासविण्यासाठी, जातीय समानतेचे तत्व अंमलात आणीत आहो असे दाखविण्यासाठी डेप्युटी कलेक्टर व डेप्युटी मॅजिस्ट्रेटच्या जागा निर्माण करण्यात आल्या आणि ह्या पदांपर्यंत आपण पोहचू शकतो असे काही भारतीयांना वाटले.

**न्यायव्यवस्थेचे पुनर्संघटन (*Judicial Reorganization)***

ईस्ट इंडिया कंपनीने भारतातील प्रदेश भिन्नभिन्न मार्गांनी मिळविले. मुंबई पोर्तुगालच्या राजाने आपल्या कन्येच्या विवाहात इंग्लंडचा राजा चार्ल्स द्वितीयला आंदण स्वरुपात पण सत्तेच्या पूर्ण अधिकारासह दिले आणि इंग्लंडच्या राजाने मुंबई कंपनीकडे नाममात्र किरायाने १६६८ मधे सोपविली कोरोमंडल तटावरील मद्रास व आजूबाजूचा प्रदेश कर्नाटकच्या नबाबाकडून कंपनीला कायम स्वरुपात कच्चा प्रशासकीय धोरणातील बदल आणि त्यांचा ब्रिटीश वसाहतींच्या हितांशी संबंध मिळाला बंगालची स्थिती काहीशी वेगळी होती कारण तेथे कंपनीची सत्ता दुहेरी शासनव्यवस्थेच्या तून चालत होती. बक्सारच्या लढाईत पराभूत झाल्यानंतर तत्कालीन मुगल सम्राट ग्राह आलमने नचे बंगाल, बिहार व ओरिसाथै दिवाणी हक्के कंपनीला दिले. अशाप्रकारे संपूर्ण बंगाल प्रांताच्या कार्याची जबाबदारी कंपनीकडे आली आणि त्यात दिवाणी खटलेही समाविष्ट होते. निजामतीचे कायदा व सुव्यवस्थेचे अधिकार बंगालच्या नबाबाकडे होते. प्रत्यक्षात हे कार्य नायब नबाब पहात

१६६८ मधे मुंबईची सत्ता मिळाल्यावर कंपनीने तेथे फौजदारी व दिवाणी न्याय देणे सुरु केले. ख्या कमी असल्याने त्याबाबत फारशा समस्या उद्भवत नव्हत्या. इंग्लंडमधील प्रथेचे अनुकरणी - कंपनीने फौजदारी बाबतीत धार्मिक सहिष्णूता तसेच ज्युरी द्वारा निर्णयाची पद्धती ठेवली. १७१८ ज्यूरी पद्धती समाप्त करून न्यायालयांमधे अपील करण्याची तरतूद सुरु करण्यात आली. गव्हर्नर त्याची कौन्सील अपीलाची सुनावणी करीत. न्यायाधीशांमधे एक हिंदू, एक मुसलमान, एक पारशी, एक जव एक कंपनीचा प्रतिनिधी रहात होता. १७२६ मधे नगरात महापौर न्यायालय (*Mayor's Court)* करण्याची परवानगी कंपनीच्या संचालकांनी इंग्लंडच्या राजाकडे मागितली. त्यानुसार

कलकत्ता - व मुंबईमधे महापौर आणि ९ ज्येष्ठ व्यक्ती असे मिळून प्रत्येकी महापौर न्यायालय स्थापन करण्यात कंपनीचे नोकर आणि वखारीत काम करणारे ह्यांचा न्यायनिवाडा करण्याचे कार्य ह्या न्यायालयाकडे होते.

देशाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळी न्यायपद्धती असल्याचे कंपनीला दिसून आले. हिंदू आणि नांची न्यायपद्धती भिन्न होतीच पण काही ठिकाणी हिंदूहिंदूंमधे आणि मुसलमान-मुसलमानांमधे न्याय होता. साधारणपणे आम्ही असे म्हणू शकतो की, इंग्रज येण्यापूर्वी भारतातील न्यायपद्धती हिंदू व मुसलमानांच्या प्रथा, परंपरा, स्थानिक रितिरिवाज आणि शासकांची इच्छालहर हयांचे होते. पण ही न्यायपद्धती स्विकारण्यास येथे वसाहती स्थापन करणाऱ्या युरोपियन व्यापारी - तयार नव्हत्या. प्रामुख्याने मुसलमानांच्या कुराणानुसार अंगभंग करणे, दगड मारून गुन्हेगाराला दणे, हिंदूंची साक्ष मुसलमानाच्या साक्षीपेक्षा कमी महत्वाची मानणे असे होते. ब्राम्हण वर्गासाठी वेगळा - आणि शूद्रांसाठी वेगळा हेही मान्य होण्यासारखे नव्हते. युरोपमधे राष्ट्रराज्यांच्या उदयाबरोबर कायदाप्रणाली अस्तित्वात आली आणि युरोपियनांनी आपल्या वर्चस्वाखालील भारतीय प्रदेशात पद्धतीचा समान कायदा लागू करण्याचा प्रयत्न केला.

भारतात आधुनिक न्यायव्यवस्था स्थापन करण्याचे श्रेय वॉरन हेस्टिंग्जकडे जाते. त्याने न्यायालयांची बद्ध रचना केली. प्रत्येक जिल्हयात दिवाणी व फौजदारी न्यायालये स्थापन केली. त्यावर अपील ची व्यवस्था कलकत्त्याला असलेल्या सदर दिवाणी न्यायालयात व सदर फौजदारी न्यायालयात आली. पण लॉर्ड कॉर्नवॉलिसचे कार्यही महत्वाचे आहे. त्याने दिवाणी व फौजदारी न्यायालयांची साखळी तयार केली. जिल्हयातील सर्वात कनिष्ठ स्तरावरचे न्यायालय म्हणजे मुन्सिफ य होते आणि त्यात भारतियांची न्यायाधीश म्हणून नियुक्ती होत होती व त्यांना ५० रु. पर्यंतचे चालविण्याचा अधिकार होता. त्यावर रजिस्ट्रारचे न्यायालय होते. त्यात युरोपियन न्यायाधीश असत त्यांना २०० रु. पर्यंतचे खटले चालविण्याचा अधिकार होता. त्यावर नगर किंवा जिल्हा न्यायालयात करता येत होते. जिल्हा न्यायालयातून चार प्रांतीय न्यायालयात अपील करता येत होते. ह्या - कलकत्त्याला असलेली सदर दिवाणी व सदर फौजदारी न्यायालये होती. काही खटल्यांच्या इंग्लंडमधे प्रिव्ही कॉंसिलकडे अपील करण्याची तरतूद होती. १७९३ मधील कॉर्नवॉलिस संहितेने न्यायव्यवस्थेला एक व्यवस्थित संघटित रुप प्रदान केले व ही व्यवस्था त्याच स्वरुपात चालत राहिली.

**न्यायव्यवस्थेची वैशिष्ट्ये -**

### (१) कायद्याचे राज्य (*The Rule of Law*) -

भारतात सर्वप्रथम 'कायद्याचे राज्य' ही आधुनिक संकल्पना अंमलात आणल्याबद्दल इंग्रजांचे आभार मानावयास हवेत. दुसऱ्या अर्थाने भारतात आतापर्यंत चालत आलेली लहरी न्यायपद्धती संपुष्टात आली. लहरी न्यायपद्धती ह्याचा अर्थ कोणत्याही कायद्याचा वा नियमाचा आधार न घेता न्यायाधीशान शासकाने मनमानी करून आपल्या इच्छेनुसार, लहरीनुसार न्याय देणे होय. त्यामुळे समान खटल्या वेगवेगळ्या प्रकारचा न्याय दिला जाई. परंतु नव्या, बदलत्या स्थितीत लिखित स्वरूपात नियन उपलब्ध झाल्याने प्रत्येकाला आपल्या हक्कांची, विशेषाधिकारांची जाणीव झाली. अनेकदा व्यक्तींच्य अधिकारांवर अतिक्रमण होऊन त्यांना न्याय मिळत नसे पण निदान अशांना संधी मिळत होती की, दोष अधिका-यांना न्यायालयासमोर उभे केले जावे.

### (२) कायद्यासमोर समानता (*Equality Before Law*) -

धर्म, वर्ग, जात, वर्ण हयांचा विचार न करता कायद्यासमोर सर्वांना समान लेखले जाई, स्वाभाविकपणे पूर्वीची जमीनदार व शेतकऱ्यांसाठी वेगवेगळी असलेली न्यायतत्वे, ब्राम्हण व शूद्रांसाठी असलेले वेगळे कायदे सर्व काही समाप्त झाले. स्त्री आणि पुरुषांमधे भेदभाव करणारा मुसलमान कायदा संपुष्टात आला अर्थात कागदावरील नियम आणि प्रत्यक्षात मिळणारा न्याय नेहमीच वेगळा असतो. सर्वसाधारण जनतेल व गरीब शेतकऱ्यांना खटले चालविण्यासाठी वकील लावावे लागत आणि त्यांना शूल्क म्हणून मोठी रक्कम द्यावी लागे, पण पोलिस आणि न्यायपालिकेला आपल्याजवळील संपत्तीने वश करून धनदांडगे लोक गरीब लोकांना न्याय मिळू देत नव्हते,

**(३) वैयक्तिक दिवाणी कायदा संमत (*Recognition of Personal Civil Law*) -**

इंग्रजांच्या आधीही कोणत्याही शासकाने भारतातील वेगवेगळया धर्माच्या अनुयायांवर तसेच भिन्न भिन्न जमातींवर एकच दिवाणी कायदा लागू करण्याचा प्रयत्न केला नाही. इंग्रजांनी ती स्थिती तशीच कायम ठेवली. त्यामुळे वेगवेगळया जातीजमातिंचे, संप्रदायांचे स्वतंत्र असे दिवाणी कायदे होते. विशेषत विवाह, एकत्र कुटुंब पद्धती, दत्तकप्रथा, वारसाहक्क इ. बाबतीत आपापले कायदे पाळले जात.

(४) प्रशिक्षित न्यायालयीन अधिकारी व व्यावसायिक वकीलांची वाढ (*Growth of Trained Judical officials and professional Lawyers*) -

इंग्रजपूर्व काळात न्यायालयीन निर्णयाच्या संबंधात जमीनदार व प्रशासक हयांची महत्वपूर्ण भूमिका होती. कंपनीच्या काळात कायद्यांची लिखित संहिता तयार झाल्याने कायद्यातील बारकावे समजून घेऊन न्यायालयासमोर मांडणारा नवा सुशिक्षित वर्ग समोर आला. हा वर्ग म्हणजे व्यावसायिक वकीलांचा वर्ग होय, आपल्या अशिलाच्या (*Clients*) हक्कांचे रक्षण करून त्याचा पक्ष न्यायासनासमोर मांडण्यात ते कुशल होते, सक्षम होते. हा आधुनिक न्यायपद्धतीचा उदय व विकास होय. ह्या पद्धतीला काही मर्यादा होत्या, त्यात काही दोष होते विशेषतः न्याय मिळण्यात लागणारा विलंब तरीही त्यात अन्याय होण्याचीशक्यता कमी होती.

कंपनीची ही न्यायपद्धती निश्चितच चांगली होती कारण त्यात कायद्याच्या सर्वोच्चतेचे तत्व विहित होते, कायदा लिखित स्वरूपात होता आणि मानवतेच्या तत्वावर व पाश्चिमात्य न्यायप्रणालीवर आधारलेला होता, अर्थात चांगल्या गोष्टींबरोबर इतरही परिणाम शक्य होते. जनतेला मात्र ही नवी अपरिचित, व्यापकस्वरूपाची आणि महागडी पद्धती पसंत पडली नाही. खटले इतके लांबत की त्यातच जनतेची दमछाक होई. लोकांना कमी पैशातील व लौकर मिळणारा न्याय हवा होता, नव्या न्यायपद्धतीत खोटेपणा, चलाखी, विश्वासघात आणि पैसा ह्यांना प्राधान्य होते. खटलेबाजी वाढत गेली आणि वकीलांनी जनतेला लुटून तेच जनतेचे पुढारी बनले. हयाशिवाय ह्या पद्धतीचा दोष म्हणजे बहुतांश न्यायाधीश इंग्रज असत आणि त्यांना येथील परिस्थिती, प्रथापरंपरा, भाषा ह्यांची माहिती नव्हती व त्यातील सूक्ष्म गोष्टींबाबत ते अनभिज्ञ होते. हे परकीय न्यायाधीश भारतियांप्रती पूर्वग्रहदूषित असत. प्रामुख्याने परकीय जाणि भारतीय हयांच्यातील खटल्यात भारतियांना न्याय मिळण्याची आशाच नव्हती. हे न्यायाधीश स्वधर्मियांप्रती अधिक अनुकूल बनत. हिंदू व मुसलमान ह्यांच्यातील भांडणातही त्यांचा व्यवहार पक्षपाती होता. काहीही असले तरी त्यामुळे कंपनीचे उद्दिष्ट पूर्ण होत होते. भूमीकर व इतर करांच्या वसूलीच्या दृष्टीने ही पद्धती उपयुक्त ठरली तसेच त्यामुळे कायदा व सुव्यवस्था स्थिती सुधारली.

**आर्थिक धोरणात बदल (*Changes in Economic Policy*) -**

ढोबळमानाने १७५७ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनी एक व्यापारी कंपनी होती. भारतातून सूती व रेशीम कापड, मसाले व हस्तशिल्पाच्या या वस्तू खरेदी करून त्या जास्त किंमतीत इंग्लंड व अन्य देशात विकून नफा कमविणे हा कंपनीचा उद्देश होता. भारतात विदेशी वस्तूंची मागणी कमी असल्याने वस्तूंच्या *1757* बदल्यात कंपनी भारताला सोने व चांदी देत होती. हा व्यापार भारतासाठी किफायतदार असल्याने कासकांनी ह्या परकियांना वखारी उघडण्याची, गोदाम बांधण्याची परवानगी दिली. मात्र भारतीय वस्तू इंग्लंडमधे लोकप्रिय होऊ लागल्याने तेथील उत्पादकांनी भारतीय मालावर कर लावण्याची विनंती इंग्लंड कासकाला केली. परिणामी १७०० मधे कायदे करून भारतातील रंगीत व छपाई केलेले कापड वापरण्यास इंग्लंडमधे बंदी घालण्यात आली.

प्लासी आणि बक्सारच्या लढाईनंतर कंपनीच्या भारतातील व्यापार धोरणात काही परिवर्तन झाले. ७६५ मधे मुगल सम्राट शाह आलमने कंपनीला बंगाल, बिहार व ओरिसाचे दिवाणी हक्क दिल्याने ज्पनीच्या उत्पन्नात एकदम वाढ झाली. १७६५ मधील क्लाईव्हच्या अंदाजानुसार बंगाल, इ. प्रदेशातील ४० पाँडस् उत्पन्नातून प्रशासनखर्च वजा

जाता कंपनीला १,६५,०००० पौडस्चे उत्पन्न होते. हे उत्पन्न भूमी कराच्या वाढत्या वसूलीबरोबर वाढतच रहाणार होते. हया भांडवलातून कंपनीने जास्त माल खरेदी करूनजास्त नफा मिळविणे सुरू केले.

भारताची लूट १७५७ मधेब सुरू झाली होती. कारण आता कंपनीला बंगालमधे डच व फ्रेंच मतिस्पर्धी राहिले नव्हते. कंपनीचे प्रतिनिधी वाटेल त्या किंमतीत माल खरेदी करीत. ह्या लुटीचे प्रमाण ७७३ मधे अतिशय वाढले. नियामक कायद्यामुळे इंग्रज लष्करी आणि नागरी अधिकाऱ्यांच्या वेतनात चगलीच वाढ झाली. भारतात परकीय सैनिकांची संख्या जसजशी वाढत गेली तसतसा हा खर्चही वाढत गेला. ह्या लोकांचे वेतन, भत्ते, निवृत्ती वेतन हयांचा बोझा वाढत जाऊन भारतातून पैसा उकळला जाऊ लागला. १८ व्या शतकाच्या शेवटी इंग्लंडमधे औद्योगिक क्रांती झाली आणि त्यामुळे १९ व्या शतकाच्या हरभी इंग्लंडमधे भांडवलदारांच्या एक नवा वर्ग उदयास येऊ लागला. ह्या वर्गाने इंग्लंडमधे त्यावेळी शासन करणाऱ्या विग (*Whig)* पक्षाच्या समर्थनाने भारताच्या आर्थिक धोरणात काही परिवर्तन करण्यात यश मिळविले. १८१३ मधील चार्टर कायद्याच्या नूतनीकरणाच्या वेळी हा प्रभाव दिसून आला. कंपनीचा बहाचा व चीनशी व्यापाराचा एकाधिकार वगळता इतर सर्व व्यापार करण्याचे स्वातंत्र्य इंग्रजांना मिळाले. त्यात राहिलेल्या उणीवा १८३३ च्या चार्टर कायद्यात भरून काढण्यात आल्या. त्यानुसार कंपनीचा भारत चीनमधील व्यापाराचा अधिकार समाप्त करण्यात आला.

नवीन उदयास आलेल्या इंग्रज उद्योगपींना ॲडम स्मिथच्या (१७२३-९०) लिखाणाने मानसिक सामर्थ्य मिळाले, ॲडम स्मिथ राजकीय अर्थव्यवस्थेचा (*Political Ecomomy)* जनक मानला जातो. आपल्या 'वेल्थ ऑफ नेशन्स (*Wealth of Nations, 1776)* हया प्रसिद्ध पुस्तकात त्याने मुल व्यापाराचे' *(Laissez faire)* समर्थन केले. सर्वच राष्ट्रांवर या नव्या विचारधारेचा, सिद्धांताचा प्रभा पडला. ह्या प्रभावामुळे १८१३ व १८३३ मधे चार्टर कायदे संमत करून कंपनीचा एकाधिकार समार करण्यात आला आणि भारतीय बाजारपेठ सर्वच इंग्रज उत्पादकांसाठी बिना आयात कर खुली करण्याल आली.

मात्र हा व्यवहार एकतर्फी होता. भारतीय माल इंग्लंडमधे जाताना जबर आयात कर होता, सू व रेशमी कापडावरही इंग्लंडमधे आयात कर लावला जात होता. एच. एच. विल्सन आणि जेम्स मिल आपले पुस्तक '*History of India*' मधे साम्राज्यवादी इंग्लंडच्या पक्षपातपूर्ण धोरणाचा खालील शब्दा समाचार घेतला.

'जर असे केले नसते आणि त्यांच्यावर इतके कडक कर लावले नसते तर वाफेची शक्ती असूनह मॅचेस्टर व पेस्ले (*Paisley)* येथील कारखाने चालणे कठीण होते. हे कारखाने भारतीय उत्पादकांचा ब घेऊन उभारले गेले. जर भारत स्वतंत्र राहिला असता तर त्याने सुडाची कारवाई करून इंग्रज मालाग तसाच प्रतिबंधात्मक कर लावला असता आणि आपल्या उद्योगांना संरक्षण दिले असते. पण स्वट नसल्याने भारताला तसे करता येत नाही आणि एका परकियाच्या दयेवर अवलंबून रहावे लागते. इंग्र माल मात्र त्यांच्यावर विनाकर लादला गेला. अशाप्रकारे समान अटींवर भारताशी स्पर्धा करणे श नसल्याने परकीय उत्पादकांनी राजकीय अन्यायाच्या शस्त्राचा वापर करून आपल्या प्रतिस्पर्ध्याचा गळा दाबला.

हळूहळू भारताची आर्थिक पिळवणूक करणे हेच इंग्रजांचे उद्दिष्ट होते. हळूहळू भारताला इंग्रज उद्योगांचे कृषी उपांग बनविण्यात आले जो इंग्लंडला खाद्य सामग्री व कच्चा माल पाठवत राहीला आ इंग्लंडच्या औद्योगिक उत्पादनांसाठी मैत्रीपूर्ण बाजारपेठ बनला. (*the main thrust of Britain economic policy in India was through economic exploitaion of India. India was grad ally transformed into an agrarian appendage of industrual Britain and in return pro viding a ready market for absorbing British manufactured products.),*

**सामाजिक कायदा व शिक्षण धोरण** ***(Social Legislation and Educational Policy)***

प्लासी आणि बक्सारच्या लढाईत विजय मिळविपर्यंत कंपनीला भारताच्या सामाजिक व शैक्षणि बाबतीत लक्ष घालण्याचे कारण नव्हते. नाही म्हणावयास युरोपियन व्यापाऱ्यांच्या आधी आलेल्या, त्यांच् बरोबर आलेल्या किंवा कधीकधी नंतर आलेल्या खिश्चन धर्मप्रचारकांनी भारतातील हिंदूंच्या व मुसलमानांच सामाजिक व धार्मिक चालीरितिंवर मतप्रदर्शन करणे सुरु केले. उदा: हया धर्मप्रचारकांनी (*missionaries* ) हिंदू व मुसलमानांना उद्देशून' ह्या नावाची एक लघुपुस्तिका काढली आणि त्यात महं पैगंबराला खोटे संबोधले आणि हिंदू धर्माची मूर्तीपूजक, अंधश्रद्धाळू व अज्ञानी अशी संभावना केली. त्यांच मुख्य हेतू हिंदू व मुसलमानांना खिश्चन बनविण्याचा होता. त्यासाठी परकीय मदतीच्या आधारानेह खिश्चन धर्मप्रचारकांनी मागासलेल्या व गरीब भारतीय समाजाला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठ ार्मार्थ दवाखाने काढणे, अनाथालये सुरु करणे, निःशुल्क शिक्षणाबरोबरच भोजन व वस्त्र पुरविणान शाळा सुरु करणे अशा मार्गांचा अवलंब केला.

१७६५ ते १७७२ हया दुहेरी शासनव्यवस्थेच्या काळात, कंपनीचे सर्व लहानमोठे कर्मचारी भारताच निर्लज्ज लूट करीत होते तेव्हा इंग्रज प्रशासनाला भारतीय समाजाविषयीच्या जबाबदारीची जाणीव झाल १७६९ मधे कंपनीचा एक कर्मचारी रिचर्ड बेकर (*Richard Bechar)* कंपनीच्या संचालकांना लिहिलेल म्हणतो, "प्रत्येक इंग्रजाला दुःख होत असेल की, कंपनीला दिवाणी हक्क मिळाल्यापासून येथील ची स्थिती आधीपेक्षा अधिक वाईट होण्याचे काय कारण असावे... अत्यंत लहरी व निरंकुश शासन डिलेला हा सुंदर देश सतत सुजलाम् सुफलाम् राहिला आणि आता विनाशाच्या सीमेवर उभा आहे." -*is fine country which flourished under the most despotic and arbitrary govern- ment, is verging towards its ruin.)* समकालीन लेखक विलियम बोल्ट ह्याने आपले पुस्तक *Considerations on Indian Affairs* मधे विणकरांवर होत असलेल्या अन्याय व अत्याचारांबद्दल कहिले आहे. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथनेही कंपनीच्या भारतातील लुटीविषयी लिहून संचालकांना मस्तात लुटारुंची नियुक्ती करणारे मंडळ' *(---the board for appointment of plunderers of a)* असे म्हटले आहे. १७७२ मधे इंग्लंडचा प्रधानमंत्री लॉर्ड नॉर्थने संसदेची एक प्रवर समिती (*Select mmittee)* व एक गुप्त समिती (*Secret Parliamentary Committee)* नियुक्त केली. ह्या तीनी कंपनीच्या कार्याचे निरिक्षण करून शिफारस केली की, प्रशासन आणि व्यापार हया दोन बाबी टांपासून वेगळ्या असाव्या; इंग्लंडच्या संसदेने भारताच्या प्रशासनाचे सर्व अधिकार स्वतःकडे घ्यावे. नी नियामक कायद्यानंतर भारतातील प्रशासनाची जबाबदारी इंग्लंडच्या राजपदाकडे आली असली तीच परिस्थिती कायम राहिली.

१८०८ मधे संचालकांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटोला एक आज्ञापत्र पाठविले की, कंपनीच्या अधिनत्य प्रदेशातील जनतेच्या सामाजिक व धार्मिक श्रद्धांमधे हस्तक्षेप करू नये. ह्याचा स्पष्ट अर्थ असा की, गव्हर्नर जनरलने खिश्चन धर्मप्रचारकांच्या धर्मपरिवर्तन कार्यावर नियंत्रण ठेवावे. पण १८१३ च्या टर कायद्यानुसार ह्या धर्मप्रचारकांच्या भारतातील आवागमनावरील निबंध हटविण्यात आले आणि डमधील सर्व वेगवेगळ्या खिश्चन पंथातील प्रचारकांना भारतात जाण्याची सवलत दिली. ह्याशिवाय नीचे लष्करी व नागरी सेवेतील कर्मचारी हया धर्मप्रचारकांना मदत करू लागले.

इंग्लंडमधे त्या काळात राजकीय व वैचारिक क्षेत्रात बदल घडून येऊ लागल्याने भारताच्या सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अधिक रुची दाखविणे सुरु झाले. टोरी पक्षाची सत्ता जाऊन इंग्लंडमधे विग - त्यालाच १८३४ नंतर उदारमतवादी पक्ष *Liberal* म्हटले जाऊ लागले.) सत्तारुढ झाला आणि लॉर्ड ग्रे सत्ताधारी बनला. बेथमच्या विचाराचे पुरस्कर्ते ज्यांना दार्शनिक परिवर्तनवादी (*Philosophical Radicals)* व मानवतावादी म्हणत, आता नव्या स्थितीत इंग्लंड व त्याच्या नियंत्रणाखालील साता दापलिकडील प्रदेशातील नव्या व जुन्या वाईट प्रथांमधे सुधारणा करण्याच्या उद्योगाला लागले. डनये सुधारणांची एक लाटच आली. त्यात पहिला संसद सुधारणा कायदा (१८३२), गुलामगिरी टन कायदा (१८३३), फॅक्टरी कायदा (१८३३), नवा दारिद्रय कायदा (१८३४), नगरपालिका

सुधारणा आपदा आणि शिक्षण कायदा असे कितीतरी कायदे करण्यात आले. स्वाभाविकच ह्या कायद्यांचा भारतीयांवर प्रभाव पडला.

संसदेची भावना लक्षात घेऊन संचालकांनी असे ठरविले की, नवीन बदलाशी कंपनीने मिळतेजुळते ठेवावे म्हणजे चार्टर कायद्याचे नूतनीकरण करणे शक्य होईल. त्यांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड विलियम टेकला आदेश दिला की, हिंदू धर्मातील सर्वात वाईट प्रथा नष्ट करण्यात यावी. अशा ह्या सुधारणांच्या लबजावणी कडकरित्या सुरु झाली. गुलामगिरी प्रथा समाप्त करण्याबाबत विचार समोर आला आणि ४३ मधे तसा अधिनियम लागू करण्यात आला. विधवा विवाहाला कायदेशीर मानणारा अधिनियम १५ व ४ डिसेंबर १८२९ रोजी नियम १७ नुसार बंगाल प्रांतात सती प्रथा समाप्त करण्यात आली.

३० मधे त्याचे अनुकरण मुंबई व मद्रास इलाख्यात करण्यात आले. शिशू हत्या १७७५ मधे आणि १८०४ - संमत करण्यात आलेल्या नियमांनुसार (*Regulation)* आधीच समाप्त झाली होती. पण आता त्याची *(*१८५६) संमत केला गेला जेणेकरून ह्या विवाहानंतरची संतती कायदेशीर मानली गेली. स्त्री शिक्ष लक्ष देण्यात आले. ह्या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणजे ह्या कार्यात पुढील काळात विशेषतः १८५८ नंतर के प्रगती झाली. परदेशांशी संपर्क आणि इंग्रजी पुस्तके हयांच्या परिणामाने काही भारतीय समाजसु समोर आले ज्यात राजा राममोहन रॉय आणि ईश्वरचंद्र विद्यासागर प्रमुख होते.

**शैक्षणिक धोरणात बदल -**

समाजातील वाईट प्रथा केवळ कायद्यांनी नष्ट होणार नाही हयाबाबत युरोपियन व भारतीय समाजसुधारकांचे एकमत होते. सुव्यवस्थित शिक्षण पद्धतीमुळेच आमच्यातील उणीवा, दोष लक्षात येऊन स्त्री व पुरुष ह्यांच्यातील भेद समाप्त करून समतेची भावना जागृत करणे आणि येणाऱ्या पिढीसाठी आदर्श निर्माण करणे शक्य होते. मध्ययुगीन शिक्षण धार्मिक व व्यावसायिक होते. तत्वज्ञानावरील केवळ मुखोद्‌गत होत पण त्यातील मर्म जाणून घेण्याचा कोणी प्रयत्न करीत नसत. जिज्ञासू वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तर्क भावना ह्यांचा एकूण अभाव होता.

आधुनिक शिक्षणाच्या दृष्टिने परकीय खिश्चन धर्मप्रचारकांनी महत्वाची भूमिका पार पाडले त्यांनी १५५६ मधे गोवा येथे पहिला छापखाना सुरु केला. त्याचप्रमाणे या धर्मप्रचारकांनी कित्येक शड सुरु केल्या व अनेक पुस्तके प्रकाशित केली, डेन्मार्कच्या धर्मप्रचारकांनी तमीळ भाषेचा एक कोण्डे प्रकाशित केला. अर्थात त्यामागे शिक्षणप्रसार नव्हे तर धर्मप्रचार हा मुख्य हेतू होता.

कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कंपनीच्या नियंत्रणाखालील भारतीय प्रदेशात शिक्षण प्रसाराची जबाबदार आपल्या अंगावर घेतली नाही. तरीही त्यांनी १७८१ मधे कलकत्ता येथे एक मदरसा स्थापन केला आणि १७९२ मधे बनारस येथे संस्कृत महाविद्यालय सुरु केले. भारतातील दिवाणी खटल्यात संस्कृत व फार भाषा वापरात असल्याने ती भाषा जाणणारे विद्वान व लिपिक तयार व्हावे हा त्यामागील उद्देश होता. मात्र बंगालमधील काही सुधारकांना असे वाटत होते की, पूर्वेकडील भाषांचे ज्ञान मोलाचे असले तरी इंग्रज भाषा व साहित्यातून त्याहीपेक्षा जास्त ज्ञान मिळू शकते. ह्या विचाराच्या समर्थकांमधे राजा राममोहन रोर आघाडीवर होते. त्यांनी डेव्हिड हेअर (*David Hare)* ह्याला सोबत घेऊन बंगालचे तत्कालीन मुख् न्यायाधीश एडवर्ड हाईड इस्ट यांच्या मदतीने १८१७ मधे कलकत्त्याला हिंदू कॉलेज स्थापन केले बंगालमधील दुसरा एक पाश्चात्त्यांचा समर्थक गट यंग बंगाल गट' *(Young Bengal Group)* म्हणून ओळखला जात होता. हा गट पूर्णतः पाश्चिमात्यांकडे झुकलेला होता आणि पाश्चिमात्य चिंतन, त्यांचे सामाजिक मूल्य व खिश्चन धर्माचा समर्थक होता पण त्याचबरोबर भारतीय धर्म आणि पूर्वेकडील संस्कृतीची हेटाळणी करणारा होता. असे म्हटल्या जाते की, इंग्लंडमधील खिश्चन धर्मप्रचारकांच्या दबावामुळेच १८१३ मधे चार्टर कायद्याचे नूतनीकरण करताना कंपनीने आपल्या नियंत्रणाखालील भारतीय प्रदेशातील स्थानिक रहिवाशांच्या शिक्षणासाठी वार्षिक १ लक्ष रु. ची तरतूद केली.

**आंग्ल-प्राच्य भाषा विवाद (*Orientalist-Anglicist Controversy*).**

१८१३ च्या ह्या तरतूदीवर १८२३ पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. १८२३ मधे लोक शिक्षण सामान्य समिती (*General Committee of Public Instruction*) स्थापन करण्यात आली आणि सूचना देण्यात आली की, समितीने सरकारी शिक्षण संस्थांचे कामकाज सांभाळावे व शिक्षणासाठी अनुदानाचा वापर करावा. या समितीत १० सदस्य होते. ते ५-५ अशा सम संख्येत विभागले गेले. त्यातील एक गट प्राच्य भाषेचा (*Orientalists*) समर्थक होता. अनुदानाचा उपयोग प्राच्य भाषांच्या प्रसारासाठी केला जावा असे ह्या गटाचे मत होते. दुसऱ्या गटाचे असे म्हणणे होते की, वरील धनाचा उपयोग इंग्रजी भाषेतून पाश्चिमात्य विज्ञान व साहित्याच्या प्रसारासाठी केला जावा. दोनही गट परस्परविरोधी विचारांचे असल्याने बराच काळ अनिर्णीत अवस्था राहिली. अखेर गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिंकने ह्या समितीचा म्हणून जी.बी. मेकॉले ह्याची नियुक्ती केली. मेकॉलेने २ फेब्रुवारी १८३५ च्या प्रसिद्ध स्मरण पत्रात *minute*) इंग्रजी भाषेच्या समर्थक गटाचा पक्ष घेतला आणि ७ मार्च रोजी बेंटिंक शासनाने असा ठराव केला की, भविष्यात अनुदानाचा वापर इंग्रजी भाषेतून होणाऱ्या युरोपियन विज्ञान व साहित्याच्या चरासाठी केला जाईल. पुढे १८३८ मधे एका अधिसूचनेनुसार ही गोष्ट स्पष्ट करण्यात आली की, च्यात प्राच्या भाषांकरिता (पूर्वेकडील भाषा *Oriental learning*) कोणतेही धन उपलब्ध होणार नही

वुडचा अहवाल (*Wood's Education Despatch, 1854*)-

नियंत्रण मंडळाचा अध्यक्ष आणि नंतर भारतविषयक खात्याचा प्रथम सचिव म्हणून नियुक्त अलेल्या चार्ल्स बूडने १८५४ मधे शिक्षणासंबंधी आदेशवजा एक अहवाल भारत सरकारला पाठविला. त्याने इंग्रज नियंत्रणाखाली असलेल्या संपूर्ण भारतासाठी प्राथमिक शिक्षणापासून विद्यापीठ पर्यंतच्या शिक्षणासाठी एक स्पष्ट शैक्षणिक धोरण सूचित केले. आदेशपत्रात पुढील बाबी स्पष्ट केल्या (१) भारतात शिक्षणाचा उद्देश युरोपियन भाषांचा प्रसार हा आहे. (२) त्यासाठी माध्यम म्हणून इंग्रजी व भारतीय भाषा रहातील, त्यासंबंधी खुलासा असा होता की, प्राथमिक शिक्षणाचे माध्यम स्थानिक चश असावी. माध्यमिक व हायस्कूलमधे स्थानिक भाषा व इंग्रजी असे माध्यम असावे आणि महाविद्यालय • विद्यापीठ स्तरावर फक्त इंग्रजी भाषा माध्यम असावे, त्याचबरोबर वूडच्या अहवालात लंडन विद्यापीठाचा आदर्श समोर ठेवून कलकत्ता, मुंबई व मद्रास येथे विद्यापीठे स्थापन करण्याची सूचना होती.

**शैक्षणिक धोरण व ब्रिटीश वसाहत हितांचा परस्परसंबंध**

*(Linkage between Educational Policies and British Colonial Interests)* -

इंग्रजांच्या साम्राज्यवादी संस्थांनी (लंडनस्थित आणि भारतातील कंपनीची अधिकारमंडळे) प्रशासकीय जेपोटी इंग्रजी माध्यमातून पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीची सूचना केली. हयाशिवाय अनेक राजकीय व गरी स्वरुपाची कारणे होती जी मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीची समर्थक होती.

भारतात कंपनीच्या सत्तेचा विस्तार होत गेला तसतशी अधिकाधिक प्रशासकीय गरज निर्माण होऊ चली. विशेषतः राजस्व आणि न्याय विभागात अशा लिपिकांची व त्यावरील मध्यम श्रेणीच्या अशा अधिकाऱ्यांची गरज होती की जे स्थानिक भाषा व फारसीबरोबरच कामचलाऊ इंग्रजी जाणत होते. ह्या चारतियांना इंग्रजांच्या तुलनेत फार कमी वेतन द्यावे लागत होते.

खिश्चन धर्माचा प्रसार हेही एक उद्दिष्ट होते. तत्कालीन वरच्या दर्जाचा अधिकारी ग्रँट डफच्या नवे शिक्षण इतर धर्मियांना खिश्चन धर्माकडे आकर्षित करण्याचे एक साधन होते. ह्या विचारांशी नत असलेला मेकॉले आपल्या पित्याला लिहिलेल्या पत्रात म्हणतो, "इंग्रजी शिक्षण घेणारा कोणताही टू आपल्या धर्माला चिकटून रहात नाही. माझा ठाम विश्वास आहे की, जर आपल्या शैक्षणिक योजनांची स्थित अंमलबजावणी झाली तर बंगालमधील उच्च वर्गात येत्या ३० वर्षात एकही मूर्तीपूजक दिसणार नाही"

मेकॉलेचे स्वप्न पूर्ण झाले नसले तरी उच्च वर्गातील काही तरुण खिश्चन बनले, मेकॉले आणि ग्रँट डकला हिंदू धर्माचे महात्म्य कधीच आकलन झाले नाही. पण राजकीय दृष्टिने विचार केल्यास नवशिक्षित प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या भारतातील इंग्रज सत्तेचा समर्थक बनला. त्यात सरकारी नोकर, डॉक्टर, जिनियर, प्राध्यापक, वकील अशा सर्वांचा समावेश होता. कदाचित त्यांचे हितसंबंध इंग्रजी सत्तेशी बडल्या गेले असतील. अशाप्रकारे मेकॉलेचे स्वप्न की, तो असा वर्ग तयार करण्यात यशस्वी होईल "जो रक्त व रंगाने भारतीय पण आवडनिवड (*taste),* मत (*opinion),* नैतिकता (*morals),* व बुद्धी *(intellect)* हयाबाबतीत इंग्रज असेल" साकार झाले. अशाप्रकारे हे अर्धे इंग्रज (*Brown Englishmen* अशा मताचे बनले की, जोपर्यंत ब्रिटीश सत्ता आहे तोपर्यंत भारताची प्रगती होईल. आजही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५० वर्षांनी जुन्या पिढीतील लोक म्हणताना दिसतात की स्वातंत्र्यापेक्षा इंग्रजांचे राज्य अधिक चांगले होते इंग्लंडस्थित व कलकत्त्याचा व्यापारी वर्गसुद्धा भारतीय शिक्षणपद्धतीचे इंग्रजीकरण करण्याचा कट्टर समर्थक बनला. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय मध्यम वर्गाने भारताच्या नैसर्गिक संपत्तीचे शोषण होण्यात हातभार लावला शिवाय ते स्वतः नखशिखांत टाय, जोडे, हयासकट इंग्लंडमधे बनत असलेल्या वस्तूंचे उपभोक्ता बनले. (*The English-educated Indian middle class not only helped in exploitation of India's natural resources but also became the great con- sumers of British goods from neckties to shoes.)* १८३३ मधे कॉमन्स सभागृहात मेकॉलेने आर्थिक लाभासंबंधी पुढील वक्तव्य केले. "केवळ साम्राज्यविस्तार करणे फायद्याचे नाही. अतिशय स्वार्थी दृष्टिकोनातून पाहिले तरी ही गोष्ट स्पष्ट आहे की, भारतातील लोक आमच्या नियंत्रणाखाल आहेत पण तेथे वाईट प्रशासन आहे, लोक गरीब व अज्ञानी आहेत. त्यामुळे इंग्लंडच्या वस्तू खरेदी करू शकत नाही आणि कलेक्टर व दंडाधिकाऱ्यांना सलाम करतात हयापेक्षा आमच्यासाठी अधिक चांगले हे आहे की, त्यांचे प्रशासन चांगले रहावे, ते स्वतंत्र असावेत, त्यांचे राजे त्यांच्यावर शासन करावेत आणि त्यांच्याजवळ चांगले ज्ञान व घन असावे म्हणजे ते इंग्लंडमधील चांगले कापड वापरतील व येथे बनलेल्या काटासुरीचा वापर करतील."

*(The mere extent of empire is not necessarily an advantage. It would be on the most selfish view of the case far better for us that the people of India were well-governed and independent of us, than ill-governed and subject to us; that they were ruled by their own kings, but wearing our broadcloth and working with our cutlery, than that they were performing their 'salaams' to English Collectors and English Magistrates but were too ignorant to value or too poor to buy English manufactures.)*

**खिश्चन मिशनबरोबरचे संबंध**

खिश्चन धर्माच्या प्रसाराचे काम करणाऱ्या संस्थांना 'मिशनरी' हे नाव आहे. येशू खिस्ताचा महान संदेश जगाच्या कानाकोपऱ्यांत नेऊन पोहोचविण्याचे कार्य खिश्चन मिशनऱ्यांनी केले होते. 'खिश्चन धर्मसंस्थेने' खिश्चन धर्माच्या प्रसारास विशेष महत्त्व दिले होते. खिश्चन धर्मप्रसाराचे काम युरोपात व युरोपबाहेरील देशांत करणाऱ्या संस्थांना त्यांच्या देशांतून आर्थिक मदत मिळत असे. जगातल्या अनेक देशांत खिश्चन मिशनऱ्यांनी आपापल्या कामाचे जाळे विणले होते. भारतात ज्या खिश्चन मिशनरी आल्या त्यांचा हेतू प्रामुख्याने खिश्चन धर्माचा प्रसार करणे हाच होता. भारत हा लोकसंख्येने मोठा व अत्यंत मागासलेला देश असल्याने खिश्चन धर्मप्रसारास येथे मोठा वाव आहे अशी खिश्चन मिशनऱ्यांची पक्की समजूत होती. भारतातील वरिष्ठ जाती या हिंदू धर्माच्या अभिमानी होत्या. त्यामुळे वरिष्ठ जातीत खिश्चन धर्माच्या प्रसारास वाव नव्हता; पण कनिष्ठ जातीत मात्र खिश्चन धर्मप्रसारास वाव होता. कारण वरिष्ठ जातींनी वरिष्ठ वर्गास सर्वच हक्कांपासून वंचित ठेवले होते. भारतातील कनिष्ठ समाज हा गरीब होता, अशिक्षित होता, स्वतःच्या हक्कांबाबत फारसा जागृत नव्हता. हाच वर्ग खिश्चन धर्माची दीक्षा घेईल, वरिष्ठ वर्ग खिश्चन धर्म

स्वीकारणार नाही अशी ख्रिश्चन धर्मीयांची पक्की खात्री होती. वरिष्ठ जातींना हिंदू धर्माबद्दल प्रेम होते; पण कनिष्ठ जातींना हिंदू धर्माबद्दल मुळीच प्रेम नव्हते. त्यामुळे कनिष्ठ वर्गावरच आपण लक्ष केंद्रित करून ख्रिश्चन धर्मप्रसाराचे कार्य करावे असे ख्रिश्चन मिशनऱ्यांना वाटत होते.

**बिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा ख्रिश्चन मिशनऱ्यांबाबतचा दृष्टिकोन :**

युरोपियन व्यापाऱ्यांपाठोपाठ ख्रिश्चनमिशनरीही भारतात आले. पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज या सर्वांनीच भारतात व्यापाराच्या निमित्ताने पाऊल ठेवले ते. पोर्तुगिजांनी गोवा जिंकला होता. गोव्यात ख्रिश्चन मिशनऱ्यांना उदार आश्रय दिला होता. फ्रेंच, डच यांचीही बच्चन मिशनऱ्यांना सहकार्य करण्याचीच भूमिका होती. ब्रिटिशांची ख्रिश्चन मिशनऱ्यांबाबतची भूमिका मात्र निश्चितच चवधगिरीची व मुत्सद्दीपणाची होती. ब्रिटिशांना भारतात राज्य प्रस्थापित करावयाचे होते. व्यापार करावयाचा ते त्यांच्या धोरणाचे अग्रक्रम होते. भारतीय लोकांच्या धार्मिक जीवनात हस्तक्षेप करावयाचा नाही ही त्यांची निका होती. विशेषतः लष्करातील कोणीही शिपाई/सैनिक जर सक्तीने ख्रिश्चन झाला तर त्याचे पडसाद संपूर्ण करात उमटतील व लष्करातील सैनिक उठाव करतील यांची त्यांना भीती वाटत होती. त्यामुळे ख्रिश्चन मिशनऱ्यांना के उत्तेजन देऊ इच्छित नव्हते. बंगाल प्रांताप्रमाणेच मुंबई प्रांतातही ख्रिश्चन मिशनऱ्यांना कोणतेही सहकार्य करावयाचे अशीच ब्रिटिशांची भूमिका होती. इ.स. १८०७ मध्ये टेलर नावाचा एक ख्रिश्चन मिशनरी मुंबईत आला असता सरकारने त्याला मुंबईत वास्तव्य करण्याची परवानगी दिली नाही.

**१८१३ मध्ये सनदी कायदा व ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य :**

भारतात ख्रिश्चन धर्मप्रसाराचे काम करणाऱ्या मिशनऱ्यांबाबत ब्रिटिश सरकारने उदारतेचे धोरण स्वीकारावे असे ख्रिश्चन मिशनऱ्यांना वाटत होते व त्यांनी चगणीही केली होती. त्यांच्या या प्रयत्नास यश येऊन ब्रिटिश पार्लमेंटने इ.स. १८१३ मध्ये ईस्ट इंडिया राज्यकारभाराची नव्याने सनद देताना संमत केलेल्या सनदी कायद्यानुसार ख्रिश्चन मिशनऱ्यांना त्यांच्या दांत पूर्ण स्वातंत्र्य दिले.

महाराट्रात ख्रिश्चन धर्मप्रसाराचे काम करणाऱ्या ख्रिश्चन संस्था :- खालील सर्व संस्था एकोप्याने व परस्पर काम करत होत्या.

चर्च मिशनरी सोसायटी, मुंबई बायबल सोसायटी (कोकणात केंद्र सुरू केले)

स्कॉटिश मिशनरी सोसायटी यांचे आगमन मुंबई शहरात इ.स. १८२२ मध्ये झाले.

लंडन मिशनरी सोसायटी (सुरत, बेळगाव येथे इ.स.१८१५ मध्ये केंद्रे सुरू केली)

अमेरिकन मराठी मिशन संस्था (इ.स. १८१३ मध्येच या संस्थेची मुहूर्तमेढ मुंबई शहरात रोवली गेली.)

बऱ्यांतराच्या प्रकरणी या संस्थेची बदनामी झाली. इ.स.१८५४ नंतर या संस्थेचे कामकाज बंद पडले.

शाळा, बोर्डिंग, छापखाना बंद करावा लागला.

**धर्माकडे आकर्षित करून घेण्यासाठी ख्रिश्चन मिशनरी काय करत?**

अतिक्षित व मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी विविध शिक्षण संस्था सुरू करत.

व्याधींनी व साथीच्या रोगांनी त्रस्त लोकांसाठी मोफत दवाखाने काढत, मोफत औषधपाणी देत.

दुष्काळ पडला तर मोफत धान्य देत.

महापुराच्या प्रसंगी मदत करत.

सलेल्या लोकांना नियमित आर्थिक साहाय्य करत.

धर्मातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा या तुलनेत ख्रिश्चन धर्म कसा आदर्श आहे हे पटवून देत.

मुलांना पाठ्यपुस्तके मोफत देत.

त्रित मुलांसाठी अनाथाश्रम काढत.

ख्रिस्ती धर्माची पुस्तके मोफत वाटत.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नगर, श्रीरामपूर, नाशिक, सातारा, जुन्नर, शिरूर, बागकोट, हर्णे आपली प्रचार केंद्रे काढली होती. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या वरील कामांमुळे त्यांच्याबद्दल एक प्रकारची सहानुभूती प्रामुख्याने गरीब लोकांना वाटे. धर्मांतराची बहुतांश कारणे बिगरधार्मिक आहेत.

ख्रिश्चन धर्मातील समता, मानवतावाद, एकेश्वरवाद या तत्त्वांचा मोठा प्रभाव भारतीय विचारवंतांवर पडला होता. १९ व्या शतकाच्या प्रारंभी मुंबई प्रांतात ज्या ख्यातनाम व्यक्तींनी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला होता त्या व्यक्ती होत्या -

१) विष्णू भास्कर करमरकर

२) रामकृष्ण विनायक मोडक

३) नारायण शेषाद्री / श्रीपती शेषाद्री

४) बाबा पदमनजी

५) पंडिता रमाबाई

६) नीळकंठशास्त्री गोन्हे

७) कविवर्य नारायण वामन टिळक

८) गोविंदराव काणे

९) बाळा गोपाळ जोशी

संयमी व नम्र पद्धती ख्रिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसारार्थ वापरल्याने त्यांचे नाव मुंबईत बरेच परिचित झाले होते. ख्रिश्चन धर्मोपदेशकांचा मतप्रचार व कार्यपद्धती यांकडे अनेक उच्चवर्णीय नवशिक्षित तरुण ओढले गेले.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्त्य देशांतून भारतात आलेले ख्रिश्चन धर्मोपदेशक हे प्रोटेस्टंट पंथाचे होते. भारतातील जास्तीत जास्त लोकांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. या प्रोटेस्टंट पंथीयांची व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, मूलभूत राजकीय हक्क या मूल्यांवर श्रद्धा होती. त्यांची कार्यपद्धती अत्यंत सुज्ञतेची व सुसंस्कृतपणाची होती. सक्ती किंवा जुलूम नव्हे तर विचारपरिवर्तनावर त्यांचा भर होता. हे ख्रिश्चन धर्मोपदेशक येथील भाषा शिकले. येथील लोकांत मिळून मिसळून त्यांनी सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या अडचणी त्यांनी समजून घेतल्या. ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी शूद्रातिशूद्रांना शिक्षणाची गोडी कशी लागेल याचा प्रामुख्याने प्रयत्न केला होता. ख्रिश्चन धर्माची तत्त्वे ही केवळ मनुष्याच्या पारमार्थिक कल्याणालाच नव्हे तर ऐहिक उत्कर्षाला पोषक आहेत असा दावा ख्रिस्ती धर्मोपदेशक करत. ख्रिश्चन धर्माच्या प्रसारामागे उदात्त कारणे नव्हती.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शैक्षणिक, वृत्तपत्रे क्षेत्रांतील कार्य :-**

**शैक्षणिक कार्य :-**

१) ख्रिश्चन मिशनऱ्यांनी मुंबईत मुलींसाठी शाळा काढल्या. इ.स. १८२० पर्यंत अमेरिकन मिशनऱ्यांच्या शाळांची संख्या २१ होती. इ.स. १८२४ मध्ये त्यांनी मुंबईत मुलींसाठी व दलितांसाठी स्वतंत्र शाळा काढली. अवघ्या २ वर्षांत मुलीच्या ९ शाळा त्यांनी काढल्या. तेथे २०० मुली शिकत होत्या. इ.स. १८३२मध्ये मुलींच्या १२ शाळा मुंबईत चालत होत्या व तेथे ३०० मुली शिकत होत्या. इ.स. १८३६ मध्ये बोर्डिंग स्कूलची कल्पना या मंडळींनी अमलात आणली. मुंबईत शाळा सुरू करण्याबाबत डॉ. विल्सन यांनी विशेष पुढाकार घेतला होता. मुंबईबाहेरही काही ठिकाणी मिशनऱ्यांनी शाळा सुरू केल्या. इ.स. १८३३ मध्ये पुणे शहरात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी दोन-तीन शाळा काढल्या होत्या. महाराष्ट्रात मुंबई व पुणे येथे अमेरिकन मिशन व स्कॉटिश मिशन या मिशनरी संस्थांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. मुंबईत फ्री चर्च विद्यालय ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चालविले होते.

२) ख्रिश्चन मिशनऱ्यांनी प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणावर अधिक भर दिला होता. वास्तविक मुंबई प्रांतात मुलींच्या शिक्षणाची कोणतीच सोय नव्हती. स्त्रियांना शिक्षणाचा हक्कच येथील समाजाने नाकारला होता. या पार्श्वभूमीवर ख्रिश्चन मिशनऱ्यांचे स्त्री शिक्षणाबाबतचे कार्य प्रशंसनीय आहे.

३) ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्याचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे कनिष्ठ जातीतील मुलांना शैक्षणिक सोयी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अमेरिकन मराठी मिशनचे कार्य उल्लेखनीय आहे.

आधुनिक भारताचा इतिहास : महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात/८८

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी ग्रामीण भागात शैक्षणिक कार्य केले होते हे एक विशेष होय. अमेरिकन मराठी मिशनचे मुख्य कार्यालय अहमदनगर येथे होते. ख्रिश्चनांचा मनमिळाऊपणा, समर्पणशीलता, दयाबुद्धी, परोपकार, गरिबांचा कळवळा, आत्मीयता या गुणांमुळे भारतीय लोक ख्रिश्चन धर्माकडे आकर्षिले गेले. त्यांच्याभोवती लोकांची गर्दी वाढत गेली. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्रात समाजसुधारणा व धर्मसुधारणा चळवळी उभ्या राहिल्या. १८३५ साली ३ पारशी तरुणांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता.

**वाङ्मयीन क्षेत्रातील कार्य :-**

ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी स्थानिक लोकांशी संवाद कसा साधावयाचा हा प्रश्न होता. म्हणून त्यांनी प्रथम मराठी भाषा आत्मसात केली होती. इ.स. १८१७ मध्ये अमेरिकन मराठी मिशनच्या लोकांनी देवनागरी टाईप वापरून बायबलच्या काही भागांचे मराठीत भाषांतर केले. याच काळात मिशनरी लोकांनी मराठी-इंग्रजी शब्दकोश, मराठी भाषेचे व्याकरण यासारखी मराठी भाषेतील पुस्तके प्रकाशित केली. डॉ. कॅरें या ख्रिश्चन मिशनमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीने इ.स. १८०५ मध्ये मराठी भाषेचे व्याकरण प्रसिद्ध केले. इ.स. १८१० मध्ये इंग्रजी-मराठी कोश तयार केला. कॅप्टन पदापर्यंत पोहोचलेल्या थॉमस कैंडी यांनी भारतात ५० वर्षे वास्तव्य केले. या काळात त्यांनी इंग्रजी-मराठी शब्दकोश, मराठी व्याकरण, पुस्तके परीक्षण, कायदे, इतिहास-भूगोल, नीतिकथा, बोधकथा, शालेय विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके असे एकूण ५० ग्रंथ लिहिले. मराठी भाषा व साहित्याची सेवा करून त्यांनी मोठे नाव मिळवले. कॅप्टन जॉर्ज रित्सो जव्हिसनयाने दलितविषयक ग्रंथ इंग्रजीत लिहिले व त्याचे मराठी भाषांतरही केले. रॉबर्ट ड्रमंडने मुंबईत मराठीचे व्याकरण तयार केले.

ख्रिश्चन धर्मोपदेशक हिंदू धर्मातील दोषस्थळे दाखविणाऱ्या लहान-मोठ्या पुस्तिकाही प्रकाशित करत. इ.स. १८४२ मध्ये 'ज्ञानोदय' हे पत्र अमेरिकन मिशन प्रेसने सुरू केले. प्रारंभी ते पाक्षिक होते. नंतर ते

चहिक झाले. ख्रिस्ती धर्माची माहिती देणाऱ्या अनेक पुस्तिका ख्रिश्चन मिशनरी संस्थांनी प्रकाशित केल्या होत्या. मनजी यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता. 'अरुणोदय' या नावाचे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. त्यात त्यांनी ख्रिस्ती का व कसे झालो हे सांगितले आहे. बाबा पद्मनजी हे ख्रिस्ती लोकांत फारच प्रसिद्ध होते. इ.स. मध्ये 'येशू ख्रिस्ताचे चरित्र' हे पुस्तक त्यांनी एकूण ७ खंडांत लिहिले.

इ.स. १८५० पासून पुढे ५० वर्षे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अपूर्व असे कार्य केले. धर्मांतर घडवून आणत डंगताना मिशनऱ्यांनी बुरसटलेल्या ब्राह्मणी विचारप्रणालीला धक्के दिले. जे प्रमुख ख्रिश्चन उपदेशक मुंबई व मांनीट्रात आले त्यात जेम्स मिचेल, जॉन स्टीव्हन्सन, जॉन विल्सन, मरे मिचेल हे प्रमुख होते.

इ.स. १८३९ मध्ये मुंबई शहरात दोन पारशी तरुणांनी ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली तेव्हा मोठी खळबळ होती. कोर्टकचेऱ्या झाल्या, त्या प्रक्षोभक घटनेचे पडसाद पुण्यातही उमटले.

मिशनऱ्यांनी सेवावृत्तीचा एक वस्तुपाठच जनतेपुढे ठेवला होता. सार्वजनिक आरोग्य, रुग्णाची सेवा, पांची सेवा ही कामे त्यांनी अत्यंत ममतेने केली.

हिंदू धर्मातून दलित जातीमधून जे लोक ख्रिश्चन धर्मात दाखल झाले त्यांचे शूद्र, अतिशूद्र व चांडाळ हे तीन होत आहेत. हे बाटलेले लोक एकमेकांसोबत रोटी-बेटी व्यवहार करत नसत व आपापल्या जातीतील प्रथा- चे पालन करीत असत. मुस्लीम कडवे असल्याने त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला नाही.

**सामाजिक सुधारणांचे प्रयत्न व उपाय (इ.स. १८२८ ते १८५७)**

आधुनिक भारतात इ.स १८२८ पासून अधिकृत सामाजिक सुधारणांना प्रारंभ झाला असे म्हटले जाते. १८२८-१८३५ या काळात लॉर्ड विलियम बेंटिंग हा ग. ज. होता. अत्यंत पुरोगामी, उदारमतवादी व जनहिताची काळजी असणारा ग. ज. म्हणून त्याची ख्याती होती. पी. ई. रॉबर्ट्सच्या मते, "लॉर्ड विलियम बेटिंगने भारतावर शहाणपणाने, सचोटीने आणि कल्याणकारी भावनेने राज्य केले. राजा राममोहन राय यांनी १९ व्या शतकातील 'भारतातील सर्वश्रेष्ठ सृजनशील व्यक्ती' या शब्दात बेंटिंगचा गौरव केला आहे. सन १८२८-३५ या काळात लॉर्ड बेटिंगने सामाजिक सुधारणेसाठी खालील उपाययोजना केल्या.

1) **सतीप्रथा बंद केली (१८२८) :-**

उच्चवर्णीय ब्राह्मण, क्षत्रीय, राजपूत लोकांत सतीप्रथा होती. पतीच्या मृत्यूबरोबर पत्नीने स्वतः जाळून घेऊन आयुष्य संपवावे अशी ही प्रथा होती. सती जाण्यामुळे त्या स्त्रोच्या पतीच्या ७ पिढ्यांना स्वर्गप्राप्ती होते, असा समज होता. पोर्तुगीज, फ्रेंच व डचांनी त्यांच्या ताब्यातील प्रदेशात ही प्रथा बंद करण्याचे प्रयत्न केले होते. बेंटिंगपूर्वी लॉर्ड कॉर्नवॉलिस, मिंटो, लॉर्ड हेस्टिंग्ज यांनीही ही प्रथा बंद करण्याचे प्रयत्न केले; पण त्यांना यश आले नाही. ही प्रथा बंद व्हावी म्हणून राजा राममोहन रॉय व अन्य सुज्ञ नागरिकांनी ब्रिटिश सरकारकडे वारंवार लेखी अर्ज केले होते. अकबर, औरंगजेब, पेशवे व जयपूरचा राजा यांनीही ही कुप्रथा बंद करण्याचे अयशस्वी प्रयत्न केले होते. पण लॉर्ड बेंटिंगने सन १८२९ मध्ये सतीबंदी कायदा केला. सती जाणे किंवा सती जाण्यास प्रोत्साहन देणे हा कायद्याने गुन्हा ठरविला व या कायद्याची कडक अंमलबजावणी केली.

**२) बालहत्या प्रथा बंदी कायदा**

काही रजपूत जमातीत नवजात मुलींना मारून टाकण्याची प्रथा होती. कारण मुलींच्या जन्मामुळे आपत्ती, संकटे येतात, हुंडा द्यावा लागतो असा लोकांचा समज होता. ही प्रथा बंद करण्यासाठी ब्रिटिशांनी कायदा केला व त्याची अंमलबजावणी केली. या प्रथेविरुद्ध स्वामी दयानंद वा त्यांच्या अनुयायांनी आवाज उठविला होता.

**३) नरबळी प्रथा बंदी :** बंगालमधील सागरी भागात आणि मद्रास प्रांतात काही विशिष्ट प्रसंगी नरबळी देण्याची प्रथा होतो. नरबळीसाठी बालकाची निवड केली जाई. ही प्रथाही कायद्याने बंद केली गेली.

**४) ठगांचा बंदोबस्त :-** ठग हे निर्दोष व दुर्बल लोकांना लुटत असत. मोगल कालखंडात त्यांच्या टोळ्या अस्तित्वात आल्या. अवधपासून हैदराबादपर्यंत आणि राजपुताना व बुंदेलखंडात ठग विशेष प्रसिद्ध होते. संस्थानिकांच्या अधिकाऱ्यांचा त्यांना पाठिंबा होता. गुप्त भाषा, ठरावीक संकेत व खाणाखुणांद्वारे ते आपला हेतू साथीदारांना कळवत. ठग श्रीमंतांना, व्यापाऱ्यांना लुटत व प्रसंगी त्यांची हत्या करीत. ठगांमुळे शांतता व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाले होते. ठगांचा बंदोबस्त करण्याचे काम कर्नल विलियम स्लीमनकडे सोपविले. १५०० ठगांना पकडण्यात आले. त्यापैकी अनेकांना फाशी दिले गेले. काहींना तुरुंगात टाकले. ठगांचा नायनाट करण्याचा प्रयत्न झाला. संघटित गुन्हेगारी कमी झाली. ठगांच्या त्रासापासून लोकांची मुक्तता झाली.

**५) शैक्षणिक सुधारणा** सामाजिक सुधारणांचा अत्यंत प्रभावी मार्ग म्हणजे शिक्षण अशी लॉर्ड बेंटिंगची धारणा होती. ग. ज. विधी कौन्सिलचा तो सदस्य होता. लॉर्ड मेकॉले यांनी भारतीय साहित्य, आयुर्वेद, गणित, ज्योतिष, इतिहास, भूगोल आदी शिक्षणावर टीका केली. लॉर्ड मेकॉलेला 'रंगाने व रक्ताने भारतीय, पण विचार, प्रवृत्ती व बुद्धीने ब्रिटिश' असा एक वर्ग निर्माण करावयाचा होता. बंगाल पुढील ३० वर्षांत एकही मूर्तिपूजक राहू नये ही बाब त्यास शिक्षणाच्या माध्यमातून साध्य करावयाची होती, ब्रिटिशांनी उच्च पाश्चात्त्य शिक्षण भारतीयांना इंग्रजी माध्यमातून देण्याचा निर्णय घेतला. इ.स. १८३५ पासून इंग्रजी भाषा, साहित्य, राजकीय विचार, नैसर्गिक विज्ञान आदींचे शिक्षण भारतीयांना दिले जाऊ लागले. इंग्रजी पुस्तकाने घर विटाळते असा गैरसमज भारतीयांत होता. पण तो पुढे कमी झाला. इ.स. १८३५ मध्ये बॅटिंग यांनी कलकत्ता येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले.

१८१३ च्या चार्टर ॲक्टन्वये आधुनिक विज्ञानाच्या शिक्षणासाठी कंपनीने दरवर्षी १ लाख रुपये खर्च करावेत आदेश दिला. शिक्षण हे उच्चवर्गीयांकडून खालच्या वर्गाकडे झिरपत जाईल हा 'झिरपणी सिद्धांत' ब्रिटिश कार्याऱ्यांना प्रारंभी मान्य होता. शिक्षण कनिष्ठ वर्गापर्यंत झिरपले नाही तरी सुशिक्षित भारतीयांनी शहरी व ग्रामीण राष्ट्रवाद, लोकशाही, सामाजिक व आर्थिक न्याय, साम्राज्यवादाचा विरोध आदी कल्पनांचा प्रसार केला. १८४४ मध्ये इंग्रजी भाषेचे ज्ञान असणारांनाच सरकारी नोकऱ्या असे धोरण सरकारने घोषित केले.

**६) धर्मांतरितांच्या पैतृक संपत्तीवरील हक्कास मान्यता :** हिंदू धर्म कायद्यानुसार जर एखाद्या व्यक्तीने मूळ हिंदू धर्म सोडून ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला तर त्याचा वडिलोपार्जित संपत्तीवर हक्क राहत नसे.

बेटिंग याबाबत सुधारणा कायदा करून हिंदूने ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यावरही आपल्या वडिलोपार्जित मालमत्तेवर कायम राहील, असे घोषित केले. स्त्रियांच्या व्यापारावर बंदी: खान्देश व वऱ्हाडात स्त्रियांना पळवून नेऊन त्यांचा व्यापार करणाऱ्या टोळ्यात्यांचा बेंटिंगने कडक बंदोबस्त केला.

**७) योग्यता/पात्रता हाच सरकारी नोकरीतील निकष :-** इ.स. १८३३ च्या चार्टर ॲक्टनुसार पात्रता (योग्यता) चसरकारी नोकरीसाठी आधार ठेवण्यात आला. 'धर्म, जन्म, जाती किंवा वर्ण या आधारावर कंपनीच्या नाखाली कोणत्याही भारतीय नागरिकाला कोणत्याही पदापासून वंचित ठेवता येणार नाही,' असे कलम त्या यात अंतर्भूत करण्यात आले.

**अनिष्ट रूढी-प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा, दैववाद आदींचा प्रभाव कमी करण्यात ब्रिटिश सरकारचे भारतीय समाजसुधारकांचे प्रयत्न:**

लोकहितवादी, आगरकर, म. फुले, ताराबाई शिंदे या समाजसुधारकांनी जातील अनिष्ट रूढी, प्रथा, चालीरीती, अंधश्रद्धा, दैववाद, ब्राह्मणांचे वर्चस्व यावर टीका केली होती. त्याचा म व ख्रिश्चन मिशनरींनी वरील गोष्टींवर केलेली टीका म्हणून त्यांचे प्रस्थ हळूहळू कमी होत गेले. समाजात निष्ठा व बुद्धिवाद वाढत गेला.

**गुलामगिरीची प्रथा बंदीचा कायदा:-** सन १८३३ मध्ये ब्रिटिश साम्राज्यात गुलामगिरीची प्रथा समाप्त करण्यात आली व भारतातही ती समाप्त व्हावी म्हणून इ.स. १८३३ च्या चार्टर ॲक्टच्या कायद्यास एक कलम केडण्यात आले. १८४३ पासून संपूर्ण भारतात गुलामगिरीची प्रथा बेकायदेशीर घोषित करण्यात आली. मालकांना कोणतीही नुकसानभरपाई न देता गुलामांना स्वतंत्र करण्यात आले.

डॉ. रमेशचंद्र दत्त यांच्या मते, "बेंटींगचा ७ वर्षाचा काळ शांततेचा व सुधारणांचा होता.... बेंटोंगने प्रशासन लोकांच्या हितासाठी वापरले." फ्लॉरेन्स नाईटींगलने रिपनला भारताचा उद्धारकर्ता अशी पदवी दिली होती.

**समाज सुधारणेसाठी ब्रिटीश संमत कायदे :-**

१) १८५६ चा भारत सरकारचा विधवा पुर्नविवाह कायदा: बंगालमधील प्रसिद्ध समाजसुधारक पं. इंचरचंद्र विद्यासागर हे विधवांच्या विवाहाचे समर्थक व बहुपत्नी प्रथेचे कट्टर विरोधक होते. स्त्री शिक्षणास साहन देण्यासाठी त्यांनी अनेक बालिका विद्यालये स्थापन केली होती. इ.स. १८५७-५८ या एकाच वर्षात बंगालमध्ये त्यांनी ३५ विद्यालये स्थापन केली होती. त्यांच्याच प्रयत्नामुळे ब्रिटिश सरकारने विधवा पुर्नविवाह कायदा १८५६ मध्ये पास केला. ईश्वरचंद्र विद्यासागर हे कलकत्त्याच्या संस्कृत महाविद्यालयाचे प्राचार्य होते. वैदिक साहित्याच्या अभ्यासातून त्यांनी सिद्ध केले की, वेदांमध्ये विधवा विवाहास मान्यता होती. त्यांनी विधवा विवाहाचा कायदा पास करावा म्हणून १००० सह्यांचा अर्ज सरकारकडे पाठविला.

२) इ.स. १८७२ मध्ये सिव्हिल मॅरेज ॲक्ट पास झाला. त्यानुसार मुलीचे वय कमीत कमी १४ व मुलाचे वय १८ ठरविण्यात आले.

३) इ.स. १८९१ चा 'एज ऑफ कन्सेंट ॲक्ट' या कायद्यानुसार १२ वर्षांखालच्या मुलीचा विवाह बेकायदेशीर ठरविण्यात आला.

४) शारदा कायदा ( १९२१) या कायद्यानुसार विवाहासाठी मुलीचे वय १४ वर्षे आणि मुलाचे वय १८ वर्षे ठरविण्यात आले.

४) सामाजिक-धार्मिक सुधारणांच्या चळवळी

१७५७-१८५७ या १०० वर्षांच्या काळात ब्रिटिशांची राजवट स्थिर झाली. भारतीय संस्कृती व पाश्चात्त्य संस्कृती या एकमेकांच्या निकटच्या सहवासात आल्या. भारतीय संस्कृती प्राचीन रूढी, परंपरा, कर्मकांड, बहुदेवत्व, मूर्तिपूजा, आचारविधी इत्यादी गोष्टींच्या जाळयात अडकून पडली होती तर पाश्चात्त्य संस्कृतीवर नवे विचार- आचार- विज्ञान आदी गोष्टींचा प्रभाव पडलेला दिसून येत होता. या दोन संस्कृती एकमेकांच्या सहवासात आल्यानंतर साहजिकच प्रगत, उन्नत अशा पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव भारतीय संस्कृतीवर पडला. त्यातून भारतातील सुशिक्षित लोक आत्मपरीक्षण करू लागले, चिंतन करू लागले, पाश्चात्त्य राष्ट्रांपेक्षा आपण प्रत्येक बाबतीत का मागे आहोत यासंबंधी विचार करू लागले. भारतात प्रबोधन पर्वाची सुरुवात बंगाल प्रांतात झाली. भारताला विशाल व समृद्ध असा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असूनही आपण का पराभूत झालोत यासंबंधी ते चिंतन करू लागले. त्यातून भारतीय समाजजीवन व धार्मिक जीवनात पुढील दोष किंवा उणिवा होत्या हे त्यांच्या लक्षात आले.

१) जातिव्यवस्था व स्पृश्यता पाळली जात होती.

२) वर्णव्यवस्थेचे वर्चस्व असून त्यासंबंधीची वर्णश्रेष्ठत्वाच्या अहंकाराची भावना.

३) सतीपद्धत, कन्यावधाची पद्धत.

४) बालविवाह, सक्तीचे वैधव्य किंवा विधवांच्या पुर्नविवाहास बंदी.

५) विधवांचे केशवपन, पडदा पद्धती.

६) स्त्रियांचे शिक्षणाचे अत्यंत अल्प प्रमाण.

७) बहुदेवत्वाच्या कल्पना व मूर्तिपूजेचे प्रस्थ.

८) पाप-पुण्य, पुनर्जन्म, स्वर्ग-नक आदी कल्पनांत समाज अडकून पडला होता.

९) ग्रहशास्त्रे, नक्षत्रे, राशी, ज्योतिषशास्त्र, नशीब, नवससायास, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, मंत्रतंत्र, समुद्रपर्यटन-बंदी आदी गोष्टींत समाज अडकून पडला होता.

१०) धर्माच्या नावावर समाजाचे फार मोठे शोषण ब्राह्मण पुरोहित करत होते.

११) ख्रिश्चन धर्माचा प्रसार भारतात ख्रिश्चन मिशनरी मोठ्या प्रमाणात करत होते.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हिंदू धर्मावर जे आरोप, हल्ले केले त्याचा परिणाम म्हणून हिंदू समाजातील विचारी सुशिक्षित विचार करू लागले. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादास आव्हान देण्याची शक्ती आपल्या समाजात येण्यासाठी समाज प्रगत व्हावा व त्यासाठी समाजातील भ्रामक समजुती, रूढी, अंधश्रद्धा आदी गोष्टींचे उच्चाटन होणे आवश्यक आहे हे त्यांना पटले. सर विल्यम जोन्स यांनी स्थापन केलेल्या Asiatic Society of Bengal या संस्थेतून हिंदू संस्कृतीचे तेजस्वी पैलू हिंदू विचारवंतांपुढे व समाजापुढे आले. ते हिंदू संस्कृतीमधील प्राचीन वाङ्मयाचा अभ्यास करू लागले. त्यामुळे हिंदू संस्कृती, धर्म यांचे पुनरुज्जीवन केल्यास आपल्या समाजाची उन्नती होईल असा एक विचार पुढे आला.

प्राचीन भारताचा इतिहास शिलालेख, नाणी, ताम्रपट, मंदिरे, चित्रकला आदींचा अभ्यास सुरू झाला. तसेच वेद-वेदांत, उपनिषदे, पुराणग्रंथ, स्मृतिसाहित्य यांचाही अभ्यास सुरू झाला. हा अभ्यास करण्यासाठी इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स या देशांतून विद्वान पुढे आले, त्याशिवाय भारतातूनही के. पी. जयस्वाल, डॉ. भाऊ दाजी, भगवानलाल वगैरे व्यक्ती पुढे आल्या. या सर्व विद्वानांच्या परिश्रमांतून भारतीय संस्कृतीच्या अभ्यासाला गती मिळाली. सीय जनतेला आपली संस्कृती, धर्मग्रंथ, इतिहास वगैरे गोष्टींची ओळख झाली. भारतातील विद्वानांनाही आपली कृती श्रेष्ठ, वैभवशाली असली तरी त्यात दोष आहेत याची जाणीव झाली. ही जाणीव १९ व्या शतकातील चाजिक व धार्मिक चळवळींच्या मुळाशी होती.

१८३३ मध्ये ब्रिटिशांनी भारतात इंग्रजी शिक्षणास सुरुवात केली. इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चात्त्य ज्ञान-विज्ञान, काय राष्ट्रांच्या इतिहास-भूगोल, विचारवंतांचे विचार व पाश्चात्त्य जीवन पद्धती वगैरे गोष्टींची ओळख भारतीयांना होती. स्वातंत्र्य, राष्ट्रवाद, उदारमतवाद, मूलभूत हक्क, समता, बंधुत्व आदी पाश्चात्त्य संकल्पनांचा प्रभाव सीय जीवनावर पडला होता. त्यामुळे भारतीय समाजाचे प्रबोधन होण्यास मदत झाली.

सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीच्या निर्मितीत वृत्तपत्रांचाही मोठा वाटा आहे. बेंगॉल गॅझेट, चार, दर्पण, संवाद कौमुदी, निबंधमाला, मीरत-उल-अखबार वगैरे वृत्तपत्रांनी ब्रिटिश राजवटीवर टीका करण त्याचबरोबर भारतीय समाजजीवनात व धार्मिक जीवनात जे दोष होते तेही समाजापुढे या वृत्तपत्रांच्या तून मांडले. त्यामुळे भारतीय समाज ढवळून निघाला आणि त्यातून सामाजिक व धार्मिक सुधारणा बोला गती प्राप्त झाली. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीच्या कार्यात अनेक व्यक्ती व संस्था गुंतलेल्या त्या हे दिसते.